दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे | अंक –३४७ | बुधवार,दि.२० ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-347 | Wednesday, Dt.20 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# मराठवाड्यातील पाण्याची चिंता मिटली

## प्रमुख ११ धरणे शंभर टक्के भरली

छत्रपती संभाजीनगर : सलग चार दिवसांपासून जोरदार पाऊस होत आहे. या पावसामुळे मराठवाड्यातील जवळपास सर्वच मोठ्या धरण व प्रकल्पातील पाणीसाठा शंभरीकडे वाटचाल करीत आहे. तर पैनगंगा व मनार हे दोन प्रकल्प शंभर टक्के भरले आहेत. यामुळे मराठवाड्यातील पाण्याची चिंता मिटली आहे.

राज्यात सर्वदूर पाऊस सक्रिय झाला आहे. अनेक भागात मुसळधार पाऊस होत आहे. तर आगामी काही दिवसांत अनेक भागात जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दरम्यान मराठवाड्यात ऑरेंज आणि यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.




### धरणांची आत्ताची स्थिती

मराठवाड्यातील जायकवाडी धरणात ९४.८३ टक्के, येलदरी ९३.८३ टक्के, सिद्धेश्वर प्रकल्प ९५.३५ टक्के, मांजरा ९३.२२ टक्के, निम्न तेरणा ९५.७१ टक्के, सीना– कोळेगाव ९०.१५ टक्के, पैनगंगा आणि मानार प्रकल्पात १०० टक्के पाणीसाठा. तर विष्णुपुरी ४९.४९, माजलगाव ५५.८३ टक्के पाणीसाठा झाला आहे. सध्या आवक सुरू असल्यामुळे आणि काही ठिकाणी पाऊस सुरू असल्यामुळे पाणीसाठ्यात वाढ होणार आहे.

### ११ धरण प्रकल्पांतील पाणीसाठा ९० टक्क्यांच्या वर

सध्या मराठवाड्यातल्या ११ मोठ्या धरण प्रकल्पातील पाणीसाठा हा ९०.३ टक्के म्हणजे २२८.२९ टीएमसी इतका झाला आहे. यात जायकवाडी, येलदरी, सिद्धेश्वर, मांजरा, निम्न तेरणा या धरणांतील पाणीसाठा हा शंभरीजवळ पोहोचला आहे. तर पैनगंगा, मानार या दोन प्रकल्पांत शंभर टक्के पाणीसाठा झाला आहे. त्यापाठोपाठ सीना–कोळेगाव, विष्णुपुरी, माजलगाव, निम्न दुधना प्रकल्पात पाणीसाठा झपाट्याने वाढू लागला आहे.



## शेपवाडीत पत्यावर पैसे लावुन तिर्रट नावाचा जुगार खेळ खेळणाऱ्यांना अटक

बीड /प्रतिनिधी

शेपवाडी परिसर येथे योगेश शेप यांचे पत्राचे शेडमध्ये काही ईसम हे पत्यावर पैसे लावुन तिर्रट नावाचा जुगार खेळ खेळत व खेळवित आहेत अशा गोपनिय माहीती वरुन सदर ठिकाणी मा पोलीस निरीक्षक, अंबाजोगाई यांचे आदेशाने माहितीचे ठिकाणी जावुन छापा मारला असता त्याठिकाणी गोलाकार पध्दतीमध्ये ४ ईसम नामे अंजिंक्य कदम,धनराज चाटे, योगीराज शेप,लक्ष्मण शेप सर्व राहणार अंबाजोगाई असून ते तिरंट नावाचा जुगार खेळ खेळतांना व खेळवित असताना मिळुन आले त्यांचे ताब्यातुन तिर्रट जुगाराचे साहित्य व नगदी ९३००/– रुपायाची रोख रक्कम, मोबाईल फोन व मोटार सायकल किमंत अंदाजे ३,९८,०००/– रुपये किंमतीचा मुददेमाल असा एकुन ४,०७,३००/– रुपायाचा मुद्देमाल जप्त करुन त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन स्टेशन अंबाजोगाई शहर येथे गुन्हा रजिस्टर नंबर

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

## दीड वर्षापासून घोडके नामक क्लासवन अधिकाऱ्याचा जिल्हा बँकेच्या रेस्ट हाऊसमध्ये बेकायदेशीर मुक्काम

### चंबू गबाळ आजच आवरा अन्यथा आंदोलन – ॲड. अजित देशमुख

बीड /प्रतिनिधी

बीड येथे बदलून आलेले सहकार खात्याचे तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, बीड या पदावर कार्यरत असलेले अधिकारी श्री. घोडके गेल्या दीड वर्षापासून बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विश्रामगृहात बेकायदेशीर रितीने मुक्कामाला आहेत. त्यांनी आजच चंबू गबाळ आवरावे आणि अन्य ठिकाणी राहायला जावे. अन्यथा आम्हाला आंदोलन करावे लागेल, असा इशारा जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी दिला आहे.

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, बीड ही सातत्याने वादाच्या भोवऱ्यात आहे. जिल्हा बँक शेतकऱ्यांची बँक राहिलेली नसून पुढार्यांची बँक झालेली आहे. त्यामुळे सातत्याने मागणी लावून धरत तेथील संचालक मंडळ अस्तित्वात येऊ दिले नाही. मात्र या ठिकाणी नेमलेले प्रशासकीय अधिकारी देखील कमकुवत ठरत असल्याचे दिसत आहे.

जिल्हा बँकेच्या प्रशासकीय मंडळाला त्या बँकेच्या आवारात गेल्या दीड वर्षापासून बेकायदेशीर रीतीने मुक्काम ठोकणाऱ्या तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांना रोखता येत नाही, ही बाब शरमेची आहे.

दरम्यान, याबाबत ड. देशमुख यांनी महाराष्ट्र शासन, सहकार आयुक्त पुणे, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर, जिल्हाधिकारी बीड, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड, तालुका उपनिबंधक सहकारी संस्था बीड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा बँक, बीड यांच्यासह इतरांना निवेदन दिले आहे.

एकीकडे दीड वर्षापासून शासनाकडून घर भाडे भत्ता घेणे आणि दीड वर्ष चंबुगबाळ जिल्हा बँकेत ठेवून तेथे राहणे, ही क्लास वन अधिकाऱ्याची असलेली भूमिका

(उर्वरीत पान २ वर)

## मुसळधार पावसाने; धामना नदी ओव्हरफ्लो...



जाफ्राबाद /प्रतिनिधी

जाफराबाद तालुक्यात मागच्या दोन –तीन दिवसांपासून रिमझिम पाऊस सुरु होता. मात्र रविवारी रात्री पासूनच धुव्वाधार पावसाने हजेरी लावली. यामुळे नदी नाल्यांना पूर आला. विदर्भ–मराठवाडा सीमेवरील इरला – चांडोळ (ता. जि बुलढाणा) रस्त्यावरील धामणा नदीला पूर आल्याने धामणा नदीचे पाणी पुलावरून वाहत होते.त्यामुळे दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.तर दुसरी कडे जाफराबाद तालुक्यातील बोरगाव बु येथील धामना नदी ओव्हरफ्लो झाल्याने नदीकाठच्या गावातील नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.सायंकाळी ५ नंतर धामना नदीच्या

(उर्वरीत पान २ वर)

## वाचकांना विनम्र आवाहन...

**दैनिक समर्थ राजयोगच्या ६ व्या वर्धापन दिनानिमित्त रोखठोक प्रतिक्रिया पाठवण्याबाबत...**

**दैनिक समर्थ राजयोग या शासनमान्य वृत्तपत्राचा शुक्रवार दिनांक ६ सप्टेंबर २०२५ रोजी ६ वा वर्धापन दिन होत आहे.**

**या निमित्त प्रकाशित होणाऱ्या विशेष अंकामध्ये आपण या वृत्तपत्राबद्दल आपले आलेले अनुभव, परखड मत व्यक्त करू शकता.**

**आपणास विनम्र विनंती आहे की, आपण कमी शब्दात आशय पूर्ण प्रतिक्रिया आपण तात्काळ**

**व्हाट्सअप नंबर ९८ २२ ६२ ८५ २१ यावर फोटोसह पाठवावी. ही विनम्र विनंती..**

आपलाच विश्वासू निमंत्रित
**वैभव जगदेवी विवेक स्वामी,**
**संपादक**
**दैनिक समर्थ राजयोग, बीड.**

दै. समर्थ राजयोग
राजमान्य–राजशक्ती
05 सप्टेंबर
६ वा वर्धापन दिन विशेषांक–२०२५

प्रति,
मा.श्री./सौ./श्रीमती

स.न.वि.वि.

मागील ५ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील 'दै.समर्थ राजयोग' चा ६ वा वर्धापन दिन शुक्रवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठवळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही 'वर्धापन दिन विशेषांक २०२५' चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.

आपला विश्वासू
वैभव विवेक स्वामी (संपादक)
मो.9822628521

जाहिरात दरपत्रक

| अ.क्र | विवरण | साईज | रक्कम | |
|---|---|---|---|---|
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/– | ☐ |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/– | ☐ |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/– | ☐ |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/– | ☐ |

कृपया आपण आपली व्यक्तिगत/संस्थेची जाहिरात वर दिलेल्या चौकोणात ✓ अशी मान्यता देऊन जाहिरात द्यावी ही नम्र विनंती.

प्रति,
मा.संपादक/व्यवस्थापक साहेब, दै.समर्थ राजयोग, बीड

महोदय,

वर्धापन दिन विशेषांक २०२५ करीता माझी वैयक्तिक/संस्थेची जाहिरात रु................./- पर्यंत प्रसिद्ध करावी. सदरील जाहिरात पोटी ॲडव्हान्स रु............../- रोख/चेक/डी.डी./ ऑनलाईन जमा करत आहे.

जाहिरातदाराचे नाव :

गाव : तालुका : जिल्हा :

मो.नं. :

₹5000/– ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!

जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क :–
दै.समर्थ राजयोग कार्यालय
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी
गुगल पे/फोन पे नंबर 9822628521
बँके खाते :
दै.समर्थ राजयोग
बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303

जाहिरातीच्या मजकुरासाठी जागा

आपले

वैंभव स्वामी (संपादक) मो.9822628521
श्री.संजय झाडे पा. उपसंपादक, मुंबई मो.न. 9523370422
अशोक पडोळे नांदेड जि.प्र. मो.नं. 9921893351
सुनिल सिरसाट (उपसंपादक) मो.9529715176
शेख आयेशा (का.संपादक) मो.9322129491
श्री.ज्ञानेश मातेकर (अंबाजोगाई ता. प्रतिनिधी) मो.9422742944
श्री.वासुदेव शिंदे (अंबाजोगाई कारखाना प्र.) मो.9921024320
श्री.चंद्रकांत पाटील (केज, ता.प्रतिनिधी) मो.9325705458
श्री.शंकर झाडे (वडवणी, ता.प्रतिनिधी) मो.8308530566
श्री.अनुप कुसुमकर (परळी ता.प्रतिनिधी) मो.9529154219
श्री.संतोष जेथलिया माजलगांव ता.प्र. मो.नं.9404022649
अजिज शेख पाटोदा ता.प्र. मो.नं.9421490820
श्री.राजेंद्र लाड आष्टी, ता. प्र. मो.नं. 8668479192
श्री.भारत पानसंबळ (शिरुर का.ता.प्रतिनिधी) मो.9423842946
श्री.सुनिल तोंडे धारुर ता.प्र. मो.नं.9657141439
गोवर्धन बडे धारुर प्रतिनिधी (शहर) मो.नं. .7744006418
श्री.गणेश काटकर (दिंद्रुड प्रतिनिधी) मो.9767092813
श्री.शेख फारुख (जालना जिल्हा प्रतिनिधी) मो.9168519159
श्री.प्रविण चौधरी परभणी जिल्हा प्रतिनिधी मो.नं. 9422179372
श्री.अमोल कापसे गेवराई तालुका प्रतिनिधी मो.न.9423370422
डॉ.आशिष तिवारी मंठा ता.प्र., जि.जालना मो.नं. 9156942222
तारेख शेख परतूर ता.प्र. जि.जालना मो.नं.9561600841
श्री.भगवान सोरमारे पैठण ता. प्रतिनिधी मो.नं. 9890392727
श्री.संजय भुजाळ बदनापूर ता.प्रतिनिधी मो.नं. 8999357724
श्री.मारोती सावंत घनसांगवी, ता.प्रतिनिधी मो.नं. 9511609230
श्री.हरि भालके जाफराबाद ता.प्रतिनिधी मो.नं. 9049428861
श्री.इम्रान पठाण शहागड सर्कल प्रतिनिधी मो.नं. 9922454587
श्री.शहाबाज पठाण मानूर प्रतिनिधी मो.नं. 9822176872
शिवकुमार बिरादार देगलूर/मुखेड ता. प्र. मो.नं. 9604846882
बसलिंग स्वामी मुक्रमाबाद ता. प्र मो.नं.9420540603
महादेव पांचाळ लोहा प्रतिनिधी मो.नं. 9503757543
बाबासाहेब कोलते सोयगाव,जि.औरंगाबाद मो.नं.8767567495
मनोज बिरादार मुखेड ता. प्र. मो.नं.9960757871
दादा पवळ धामणगांव प्रतिनिधी मो.नं.9689134246
श्री.राजेश भोगील जामखेड ता.प्रतिनिधी मो.9921591519
श्री.नितीन इंगळे जामनेर (जळगाव) मो.न.7249224841

## सस्नेह निमंत्रण..,
## दैनिक समर्थ राजयोगचा ६ वा वर्धापन दिन..!

शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षक दिनी दैनिक समर्थ राजयोग या वृत्तपत्राचा ६ वा वर्धापन दिन आहे.

या वर्धापन दिन सोहळ्यासाठी आपण खास निमंत्रित आहात...

स्थळ – हॉटेल नीलकमल, तहसीलच्या समोर,नगर रोड,बीड

दिनांक आणि वेळ,

शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर २०२५

वेळ – सायंकाळी ४ ते ७ पर्यंतच.

टीप – स्नेही जणांना विनंती आहे की, कृपया वर्धापन दिनानिमित्त शाल श्रीफळ पुष्पगुच्छ स्वीकारले जाणार नाहीत. या ऐवजी त्याच रकमेचे शक्य असल्यास आपण सोबत येताना शैक्षणिक साहित्य आणावे...

आपले हे शैक्षणिक साहित्य गरजवंत होतकरू विद्यार्थ्यांना दिले जाईल धन्यवाद...

आपलाच विश्वासू निमंत्रित
**वैभव जगदेवी विवेक स्वामी,**
संपादक
दैनिक समर्थ राजयोग, बीड.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG



## संपादकीय

# प्रश्न निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेचा आहे!

'कर नाही त्याला डर कशाला,' याची प्रचिती जनतेला देत निवडणूक आयोगाची विश्वासार्हता पुन्हा वाढवणे, हे निवडणूक आयुक्तांनी प्राधान्याने करायला हवे. प्रश्न व्यक्तीचा नसून, सर्वोच्च संवैधानिक संस्थेच्या विश्वासार्हतेचा आणि देशातील लोकशाही व्यवस्थेचा पाया मजबूत ठेवण्याचा आहे.

दिल्लीतील 'सेंटर फॉर स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज' ही संस्था गेल्या साठ वर्षांहून अधिक काळ भारतीय निवडणुकीसंदर्भात शास्त्रीय अभ्यास करत आहे. रविवारच्या एका वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या आकडेवारीनुसार, गेल्या २५ वर्षांत निवडणूक आयोगाची विश्वासार्हता आज सर्वात खालच्या स्तरावर पोहोचली आहे. निवडणूक आयोगाने बिहारमध्ये सुरू केलेल्या मतदार याद्यांच्या 'विशेष गहन पुनरीक्षण' (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन-एसआयआर) संदर्भात गेल्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने एक अंतरिम आदेश जारी करून आयोगाला जरब बसवली. परवा रविवार असतानाही, मुख्य निवडणूक आयुक्तांनी पत्रकार परिषद घेऊन स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतला.बिहारमध्ये आगामी ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वी मतदार यादी परीक्षण गेल्या जानेवारीतच पूर्ण झाले होते. त्यानंतर जून महिन्यात अचानक आयोगाने बिहारमध्ये 'एसआयआर' करण्याचे घोषित केले. आयोगाच्या पत्रकार परिषदेत प्रश्न विचारण्यात आला, पूर्वीच्या 'एसआयआर'च्या वेळी ज्या राज्यांत लगेच निवडणुका आहेत, ती वगळण्यात आली होती. यावेळी नेमके निवडणुकीचे बिहार राज्य का निवडले? यावर आयोग निरुत्तर होता. एकीकडे विरोधी पक्ष याद्यांमध्ये घोटाळा झाल्याचा आरोप करत आहेत, तर दुसरीकडे ते दूर करणाऱ्या 'एसआयआर'ला विरोध करत आहेत. विरोधकांचा विरोध 'एसआयआर'ला कधीच नव्हता. आजही बिहारमधील 'एसआयआर'च्या विरोधात केलेल्या अनेक अर्ज-विनंत्यांना आयोगाने केराची टोपली दाखवल्यावर, विरोधकांना सर्वोच्च न्यायालयात जावे लागले.

## विशेष संपादकीय...

# वृत्तपत्र माझे मित्र...

वृत्तपत्र हे तुमचे आमचे मित्र कसे होऊ शकतात,यावर आधारित हा लेख लिहिण्याचा प्रपंच करत आहे.

आजच्या आधुनिक इंटरनेटच्या डिजिटल युगातही वाचकांना नियमित वृत्तपत्र आपल्याला विविध विषयांची माहिती माहितीचे स्त्रोत म्हणून.देतात, सतत ज्ञान वाढवतातआणि विविध क्षेत्रासह जगाशी जोडलेले ठेवतात,इतिहासाची विविध पैलूची माहिती व अभ्यास, भविष्यातील वेध वृत्तपत्रामुळे वाचकांना उत्तम प्रकारे ज्ञान वाढवण्यासाठी फायदेशीर माध्यम ठरतात.त्यामुळे वृत्तपत्र एक विविध विषयांवर घटनाक्रमावर प्रभावी.ज्ञान वाढवणारे मार्गदर्शक जिवलग मित्र आहेत.

वृत्तपत्राला मित्र म्हणण्याची अनेक कारणे आहेत:

१.वृत्तपत्रे हे माहितीचा खजिना:

वृत्तपत्र आपल्याला देश-विदेशातील घडामोडी, राजकीय, सामाजिक, आर्थिक,धार्मिक,क्रीडा आणि मनोरंजन क्षेत्रातील ताज्या बातम्या देते.यामुळे या क्षेत्रातील सर्व घडामोडी वाचका पर्यंत पोहच करतात यामुळे तुमचे ज्ञान वाढते आणि तुम्ही जगाशी जोडलेले राहता.

२. वृत्तपत्र हे ज्ञानवृद्धी:

वृत्तपत्रातून केवळ बातम्याच नव्हे, तर विविध विषयांवरील लेख, संपादकीय, मुलाखती आणि विविध माहितीपूर्ण मजकूर वाचायला मिळतो, ज्यामुळे तुमची विचार करण्याची क्षमता वाढते आणि बौद्धिक विकास होतो.आणी संदर्भासाठी या ज्ञानाचा फायदा होतो

३. वृत्तपत्र हे जागरूक नागरिकत्व:

वृत्तपत्र तुम्हाला सामाजिक आणि राजकीय समस्यांबद्दल जागरूक करते. यामुळे तुम्ही एक जबाबदार नागरिक बनता आणि समाजातील घडामोडींवर विचार करू शकता.इतरा प्रमाणे तुम्ही स्वताचे.आपले मत मांडु शकता आणी इतरांना मार्गदर्शन करू शकतात.विविध विषयाची सविस्तर अशी माहिती वाचकांना वृत्तपत्रांच्या माध्यमातून देवु शकतात.

४.वृत्तपत्रामुळे वेळेचा सदुपयोग:

वाचकांनी प्रवासात किंवा रिकाम्या वेळेत वृत्तपत्र वाचणे हा वेळेचा सदुपयोग आहे.वृत्तपत्र सतत वाचकानां आपल्या विविध विषयांवरील माहिती द्वारे आपलेसे करतात वाचकांना कधीच एकटेपणा येवु देत नाही सतत मित्राच्या भुमिकेत राहतात.वृत्तपत्रा मुळे तुम्ही सतत काहीतरी नवीन शिकता आणि मनोरंजनही होते

५. वृत्तपत्र हा भाषा आणि शब्दसंग्रह:

नियमित वृत्तपत्र वाचल्याने तुमची बोली भाषा सुधारते आणि नव नवीन शब्द शिकायला मिळतात,ज्यामुळे तुमच्या वकृत्व शैलीवर प्रभाव वाढतो व उत्कृष्ट वक्ते होण्यासाठी मदतच होते.विविध विषयांवर चिकित्सक वृत्ती वाढीस लागते व तुमच्या वाचन क्षमतेत वाढ होते.तुमच्या लिखाणात वजनदार शब्द प्रयोग होतो.तुमचा शब्दसंग्रह वाढतो.

६.वृत्तपत्रामुळे.विचारशक्तिचा विकास

वृत्तपत्रांच्या माध्यमातून आपली विचारशक्ती विकसित होते.विचाराच्या कक्षा रुंदावत जातात आणखी स्वतः ला सक्षम करण्यासाठी मानसिक दृष्ट्या वैचारिक मंथन बौद्धिक दृष्टीने आपण करू लागतोय.वैचारिक क्षमता वाढते.विविध विषयांवरील माहिती ऐकने व दुसऱ्यास सांगणे हि बाब अत्यंत प्रभावी पद्धतीने करता येते. काही वृत्तपत्रे शैक्षणिक सदर चालवतात यांचा फायदा असंख्य शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी होतो.रोजच्या रोज घडणाऱ्या घटनांची माहिती वाचकांना वृत्तपत्रांमुळे नियमित मिळते व वाचक हा वृत्तपत्राकडे आकर्षित करतात.समाज व्यवस्थेत होणारे बदल व घटना यांच्या सोबत शासन,प्रशासन यांच्या माध्यमातून होणारे दुर्लक्ष व हक्कांचे संरक्षण करण्यासाठी वृत्तपत्र सतत जागरूक असतात.विविध सामाजिक हिताच्या प्रश्नांवर वाचा फोडण्याचे प्रभावी शक्तिशाली माध्यम म्हणून काम करतात.न्यायीक भुमिका घेवून समाजिक बांधिलकी वृत्तपत्र जपतात.सतत मैत्रीचा हात पुढे करून आदर्श समाज घडविण्यासाठी लोकशाही मजबूत करून तिचे संरक्षण करण्यासाठी व लोकशाही व भारतीय घटनेची प्रतिष्ठा सन्मान बाधित ठेवण्यासाठी वृत्तपत्र सतत प्रयत्नशील असतात म्हणूनच लोकशाहीचा तिसरा स्तंभ म्हणून.वृत्तपत्रा कडे पाहिले जाते.राजकीय नितिमुल्य, सामाजिक बांधिलकी,जनतेचे अधिकार यांचे अत्यंत सक्षम पुणे रक्षण करण्याचे काम वृत्तपत्र करतात. भारताची भावी युवा पिढीला घडवण्यासाठी सतत वृत्तपत्रे अग्रभागी असतात व युवा पिढीला मार्गदर्शन करतात.युवकांचे,विद्यार्थी वर्गाचे,तरूणांचे, प्रौढांचे, वृद्धांचे मार्गदर्शक व मित्राच्या भूमिकेत वृत्तपत्रे कायमअसतात.शेतकरी बांधवांना विविध प्रकारची शेती व्यवसाया संबंधी व पशुसंवर्धन विषयी योग्य व्यापक अशी माहिती वृत्तपत्रे देतात.विविध तंत्रज्ञांची गरज आपल्या लेखनातून वृत्तपत्रे देतात व कृषी व उद्योग ,शिक्षण, विविध क्षेत्राला प्रगती पथावर नेण्यासाठी.अन्य देशांच्या तंत्रज्ञाना संबधी आपल्या लेखनातून वृत्तपत्रे जागरूक करतात.कृषीमित्र, उद्योग मित्राची भूमिका घेतात.अशा प्रकारे, आपल्या व देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी.वृत्तपत्र हे माहिती, ज्ञान देणारे आणि सामाजिक जाणीव देणारे एक महत्त्वाचे साधन आहे,

संवेदनशील ते कठोरपणा हा वृत्तपत्राचा मुलभूत गाभा वाचकांसाठी दिशादर्शक व मैत्रिचा धागा ठरणारा असतो. म्हणूनवृत्तपत्र माझे मित्रम्हणणे योग्य ठरेल.



मानद संपादकीय...
**डॉ राजेंद्र मुरलीधर सानप**
संचालक -महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ, बीड मो.नं.९४२००१९५९७

## पान १ वरून...

**मुसळधार पावसाने;....**

पाण्याचा प्रवाह कमी झाल्याने धामना नदी काठाच्या गावांनी मोकळा श्वास घेतला.

तालुक्यातील धामणा नदीसह पूर्णा केळणा या नद्यादेखील दुथडी भरून वाहत आहे. सततच्या पावसाने उभ्या पिकांमध्ये पाणी साचले असून, पिके वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

**शेपवाडीत पत्यावर.....**


४१५/२०२५ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कार्यवाही ही मा. नवनित कॉंवत, पोलीस अधिक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, श्री. ऋषीकेश शिंदे, सहाय्यक पोलीस अधिक्षक अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री शरद जोगदंड, सपोनि कांबळे, पोउपनि अनंद शिंदे, पोलीस कर्मचारी अमोल गायकवाड, हनुमंत चादर, प्रविणकुमार गित्ते, भागवत नागरगोजे, सुशांत गायकवाड यांनी केली असुन पुढील तपास पोलीस हवालदार अमोल गायकवाड करत आहेत.

**दीड वर्षापासून घोडके ...**

शासनाची फसवणूक करणारी असल्यामुळे त्यांच्यावर आणि जिल्हा बँकेतील अधिकारी कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा नोंदवायची मागणी देखील करण्यात आली आहे.शासन आणि प्रशासकीय मंडळ, जिल्हा बँक यांना दिलेल्या निवेदनात या अधिकाऱ्यांच्या वेतनातून दिलेला घर भाडे भत्ता व्याजासह वसूल करावा. आपण करत असलेल्या कार्यवाहीची माहिती तात्काळ आम्हास द्यावी अन्यथा आम्हाला आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल, असा इशारा देखील देशमुख यांनी दिला आहे.

# मौजे आष्टी ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचारा विरोधात लढा सुरुच !

## विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषणाचा दहावा दिवस, उपोषण कर्ता भगवान वाघमारे यांची प्रकृती ढासळली



जालना /प्रतिनिधी

सर्वत्र ७९ स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असताना विभागीय आयुक्त कार्यालया समोर दि.११ ऑगस्ट रोजी पासून परतुर तालुक्यातील मौजे आष्टी ग्रामपंचात मधील भ्रष्टाचाराविरोधात गेल्या दहा दिवसापासून विभागीय आयुक्त कार्यालयासमोर भगवान रंगनाथ वाघमारे यांचे आमरण उपोषण सुरू आहे. विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांकडे उपोषणाची दखल घ्यायला सोयसुतक वेळ नाही हे दुर्दैवी पणा म्हणावा लागेल.

परतुर तालुक्यातील मोजे आष्टी ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी डी.बी. काळे व सरपंच यांनी संगणमत करून १५ व्या वित्त आयोग, चठएब्रड योजना अशा शासनाच्या वतीने विविध विकास योजनांमध्ये अफरातफर केला आणि काही विकास कामे कागदावरच तर काही कामे बोगस रित्या करून शासनाचा लाखो रुपयांच्या निधीचा गैरव्यवहार करत लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. यासंदर्भात जिल्हा परिषद जालना यांना वारंवार पत्रव्यवहार व उपोषण ही केले चौकशी समिती च्या अधिकाऱ्यांकडून चौकशी झाली पण त्या चौकशीचा निकाल अजूनही मिळाला नाही.याचा अर्थ काय विकासाच्या नावाखाली गाव लुटलं जातंय आणि ते थांबवण्यासाठी झगडणारा भगवान रंगनाथ वाघमारे विभागीय आयुक्त कार्यालय समोर दहा दिवसापासून उपोषणाला बसलाय पण तरीही प्रशासनाच्या मनात जराही हालचाल नाही. ग्रामपंचायत भ्रष्टाचाराच्या विरोधात गेल्या दहा दिवसांपासून एक आंदोलन कर्ता उपोषण करत आहे आता त्याची प्रकृती गंभीर होत चालली असतानाही संबंधित गेंड्याच्या कातडीचे अधिकारी मात्र धिम्म आहे.विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन करणारा सर्व सामान्य माणूस भगवान रंगनाथ वाघमारे उपाशीपोटी लढतोय त्याची तब्येत ढासळली तरीही गेंड्याची कातडी पांघरलेले प्रशासनातील अधिकारी संवेदना शून्य झालेत अधिकारीला लोकांच्या वेदनांचाही आता त्यांना फरक पडत नाही खरंच लोकशाही आहे का ? अशा प्रश्न सर्वसामान्य माणसाला पडला आहे. या उपोषणकर्त्याची प्रशासनाने दखल घेऊन ग्रामपंचायत मधील भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करून त्या उपोषणकर्त्याला न्याय देण्यात यावा असा प्रश्न सर्वसामान्य जनतेतून उपस्थित होत आहे.

---

**तहसीलदार मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अंबड**
जा.क्र.२०२५ /जमा-१/कावी- १५०८ दिनांक १८.०८.२०२५

### जाहीर प्रगटन

ज्याअर्थी मौ दोदडगांव येथील गट नं. २३४ मधील वहीवाटी रस्त्याबाबत नुसार अर्जदार श्रीम नंदाबाई अशोकराव शिनगारे यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार, तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.त्यानुसार दिनांक १४.०८.२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात अली होती. तथापी खालील प्रमाणे गैरअर्जदार सदर सुनावणीसाठी हजर राहत नाहीत.

प्रतीवादी :- १. कृष्णा श्रीरंग बनसोडे
२. भास्कर भाऊराव पवार
३. केशरबाई जालींदर पवार
४.चंदु लक्ष्मण काकडे
५.कल्याण निवृत्ती पवार
६. परेश कल्याण पवार
रा. दोदडगांव ता अंबड जि जालना

वरिल प्रमाणे गैरअर्जदार सुनावणीसाठी गैरहजर आहेत. मौ दोदडगांव येथील गट नं. २३४ मधील वहीवाटी रस्त्याबाबत निर्णय पारित करणे आवश्यक आहे. सबब या द्वारे आपणास जाहीर नोटीस देवुन कळविण्यात येते की, आपण ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखे पासुन ०७ दिवसाचे आत अथवा पुढील सुनावणी दिनांक २८.०८.२०२५ रोजी दु. २.०० वाजता आपले म्हणणे तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात पुराव्यासह समक्ष दाखल करावेत. आपण मुदतीमध्ये किंवा व्यक्तीशः हजर राहुन आपले म्हणणे दाखल केले नाही. त्यानुसार उपलब्ध अभिलेखे तपासुन गुणवत्तेनुसार सदर प्रकरणात निर्णय आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक- १८/०८/२०२५

**स्वाक्षरित**
**तहसीलदार अंबड**

---

**तहसीलदार मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अंबड**
जा.क्र.२०२५ /जमा-१/कावी- १२३४ दिनांक १८.०८.२०२५

### जाहीर प्रगटन

ज्याअर्थी मी लखमापुरी येथील गट नं. १३१,१३२, १३३,१३४ मधील शेतरस्त्याबाबत नुसार अर्जदार श्री सोमनाथ विठ्ठल गाडे यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार, तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यानुसार दिनांक १४.०८.२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात अली होती. तथापी खालील प्रमाणे गैरअर्जदार सदर सुनावणीसाठी हजर राहत नाहीत.

प्रतीवादी :- १. अलंकाबाई अप्पासाहेब मुळे
२. सविता राजेश गोरे
अशिवाजी विटल तांदळे
४. पुजा भागचंद गोरे
रा. लखमापुरी ता अंबड जि जालना

वरिल प्रमाणे गैरअर्जदार सुनावणीसाठी गैरहजर आहेत. मौ लखमापुरी येथील गट नं. १३१,१३२,१३३,१३४ मधील शेतरस्त्याबाबत निर्णय पारित करणे आवश्यक आहे. सबब या द्वारे आपणास जाहीर नोटीस देवून कळविण्यात येते की, आपण ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखेपासुन ०७ दिवसाचे आत अथवा पुढील सुनावणी दिनांक २८.०८.२०२५ रोजी दु.२.०० वाजता आपले म्हणणे तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात पुराव्यासह समक्ष दाखल करावेत. आपण मुदतीमध्ये किंवा व्यक्तीशः हजर राहुन आपले म्हणणे दाखल केले नाही. त्यानुसार उपलब्ध अभिलेखे तपासुन गुणवत्तेनुसार सदर प्रकरणात निर्णय आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक- १८/०८/२०२५

**स्वाक्षरित**
**तहसीलदार अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२३९ दि.१२.०८.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान लक्ष्मण अर्जुन चव्हाण रा.दहिगव्हाण खु. ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शिवाणी लक्ष्मण चव्हाण | मुलगी | २२.०३.२०१९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १२/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. आर. ए. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६४४/२०२५**
वच्छलाबाई सुदाम जेठे विरुध्द निरंक
**(मार्फतः एस. बी. बहीर, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे सुदाम महादेव जेठे हे / हया दिनांक १२/११/२०२४ रोजी बंगालीपिंपळा ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाल्या / झाले आहेत. अर्जदर १. रामहरी पि. शरद जेठे वयः १५ वर्षे धंदा : शिक्षण राः बंगालीपिंपळा, ता. गेवराई, जि. बीड आ.पा.क. आईगैरअर्जदार क्र. २ . आशाबाई भ्र शरद जेटे,व : ४० वर्षे, धंदा : शेतीरा. बंगालीपिंपळा ता. गेवराई जि.बीड २. आशाबाई भ्र. शरद जेठे, वयः ४० वर्षे धंदा : शेती रा. बंगालीपिंपळा ता. गेवराई जि.बीडासकीय / निमशासकीयकामकाजासाठी कायदेशीर वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणेवारसाचेप्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार व गैरअर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व गैरअर्जदार यांना सदर मयत नामे सुदाम महादेव जेठे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३०/०७/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०३/०९/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६७० / २०२५**
नारायण व इतर वि निरंक
**(मार्फत - ॲड. एस. एम. शेंबडे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत सखाराम पि. आबा टकले रा. बंगालीपिंपळा ता. गेवराई जि. बीड हे दिनांक १९/०३/१९९१ रोजी बंगालीपिंपळा ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत. अर्जदार क. १ नारायण पि. सखाराम टकले, वय ७६ वर्षे, धंदा शेती, रा. बंगालीपिंपळा ता. गेवराई जि. बीड, यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सखाराम पि. आबा टकले रा. बंगालीपिंपळा ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक /०८/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १२/०९/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६८३/२०२५**
सुवर्णा मच्छिंद्र खंडागळे विरुध्द निरंक
**(मार्फत -ॲड.ए.एम.सुतार,गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे रामभाउ शिलेभान भिसे हे/हया दिनांक १६/०३/२०२० रोजी रा. मारफळा ता. गेवराई जि.बीड येथे झाले/झाल्या आहेत, अर्जदार क.१.केशरबाई भ्र. रामभाउ भिसे वयः ६५ वर्षे, धंदाः घरकाम, राः मारफळा, ता. गेवराई, जि. बीड२. अनिता भ्र. गोरक्षनाथ गालफाडे, वय - ३२वर्षे, धंदा - घरकाम, रा. केतुरा, ता. जि. बीड, गैरअर्जदार क.१. लहु पि. रामभाउ भिसे, वय-३० वर्षे, धंदा-मजुरी, रा. मारफळा, ता. गेवराई, जि. बीड.२. लक्षमण पि.रामभाउ भिसे वय : ३८वर्षे धंदाः मजुरी रा. सदर यांनीशासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व यांना सदर मयत रामभाउ शिलेभान भिसे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ११/०८/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.


पुढील तारीख १६/०९/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---



## ऑल इंडिया पँथर सेना

# निवडणुकीसाठी सज्ज

### सातारा- बैठकीत रणनीती ठरली - राज्य प्रदेश प्रवक्ते नितीन सोनवणे

बीड /प्रतिनिधी

ऑल इंडिया पँथर सेनेच्या महाराष्ट्र कोर कमिटीच्या बैठकीत आगामी निवडणुकांसाठी रणनीती आखण्यात आली. सातार्यातील विश्रामगृह येथे पार पडलेल्या या बैठकीत निवडणूक तयारीवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी पुण्यात लवकरच राज्यव्यापी कार्यकर्त्यांची भव्य बैठक घेण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला.

या बैठकीला महाराष्ट्र अध्यक्ष विनोद भोळे, उपाध्यक्ष बाळासाहेब शेंडगे, सरचिटणीस जितेश भाई जगताप, प्रदेश प्रवक्ता व बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, विदर्भ अध्यक्ष दादाराव ढोले आणि कोऑर्डिनेटर अविनाश हिवाळे उपस्थित होते.

# होळ येथे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

## जंगी मिरवणूक काढून नागरी सत्कार; माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे यांची विशेष उपस्थिती

**केज (प्रतिनिधी)**

**तालुक्यातील होळचे सुपुत्र, राज्याच्या व्हीआयपी सुरक्षा विभागाचे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सेवापूर्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन रविवारी (दि.१७) सकाळी ११ वाजता होळ येथील हनुमान मंदिरात करण्यात आले. या सोहळ्यापूर्वी ग्रामस्थांनी जंगी मिरवणूक काढून त्यांचे उस्फूर्त स्वागत केले.**



कार्यक्रमाला राजस्थानचे माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. सोहळ्याचे अध्यक्षस्थान सरपंच अश्विनीताई शिंदे यांनी भूषविले. प्रमुख अतिथींमध्ये मांजरा कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक दत्ता शिंदे, माजी सरकारी वकील ॲड.प्रकाश शिंदे, पुणे सीआयडीचे माजी पोलीस उपअधीक्षक दीपक शिंदे, केंद्रप्रमुख रमेश कांबळे, माजी प्राचार्य डॉ.ज्ञानोबा सरवदे, बारामती ॲग्रोचे प्रबंधक अंकुश ढवारे, मुख्याध्यापक धर्मराज शिंदे, हृदयरोगतज्ज्ञ डॉ.नवनाथ घुगे, डॉ.गणेश ढवारे यांचा समावेश होता. यावेळी मान्यवरांचा होळ ग्रामस्थांच्यावतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांच्या पुढाकाराने पार पडलेल्या या सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने हजेरी लावली. होळ गावातील दोन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा झालेला हा गौरव सोहळा ग्रामस्थांसाठी अभिमानाचा क्षण ठरला. यावेळी जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरही उपस्थित होते.

आठवणींना उजाळा

या सोहळ्यात संभाजीराव शिंदे व अंकुशराव शिंदे यांनी आपल्या मनोगतातून शालेय जीवनापासून ते आजवरच्या प्रवासातील अनेक आठवणींना उजाळा दिला. दोघेही बनेश्वर शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी असल्याने शिक्षण संस्थेबद्दल व होळच्या मातीतून मिळालेल्या संस्कारांबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या भाषणातून गावाशी असलेली घट्ट नाळ प्रकर्षाने जाणवली.



# वाघाळा टाकळखोपा इंचा रस्त्याची दुरवस्था आमदार लोणीकरांचे अभियंत्यांना सूचना

**तळणी /प्रतिनिधी**

**मंठा तालुक्यातील वाघाळा ते इंचा या मार्गावरील रस्त्याचे काम काही महिन्यांपूर्वीच पूर्ण झाले होते. परंतु अल्पावधीतच रस्त्याची दुरवस्था होऊन मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहतूक धोकादायक बनली असून नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी परतूर-मंठा विधानसभाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे रस्ता दुरुस्तीची मागणी केली.**

नागरिकांच्या मागणीला तातडीने प्रतिसाद देत आमदार लोणीकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांना सूचना दिल्या. ते म्हणाले, वाघाळा - टाकळखोपा - इंचा रस्त्यासाठी तब्बल पाच कोटी रुपये खर्च झाले. तरीही अंदाजपत्रक व कामात गंभीर चुका झाल्या. सोलिंग,खडीकरण करून गावाच्या ठिकाणी सिमेंट रस्ता न केल्याने रस्ता अल्पावधीतच उखडून खड्डेमय झाला. नाल्याचे कामही करण्यात आले नाही. राहिलेला दीड किलोमीटर रस्ता कारण नसताना सोडून दिला गेला. या मार्गावरून जड वाहनांची वर्दळ असल्याने मजबूत सिमेंट रस्ता आवश्यक आहे. चुका कोणाच्याही असोत, आता तातडीने दुरुस्ती करून दर्जेदार रस्ता बांधणे हाच उपाय आहे. आता आमदार लोणीकरांनी दिलेल्या सूचनांनंतर नागरिकांमध्ये दिलासा निर्माण झाला असून, रस्त्याची तातडीने व दर्जेदार दुरुस्ती होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रभाकर बोरुडे सरपंच, टाकळखोपा



# कै.दत्तासाहेब देशमुख विद्यालय घनसावंगी येथे व्यावसायिक मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

घनसावंगी /प्रतिनिधी

मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कै.दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय घनसावंगी येथे विद्यार्थ्यांना नवनवीन व्यवसायाची संधी कशी निर्माण करता येईल याविषयीमहिती व्हावी यासाठी व्यवसाय विषयी मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य केशव अटकर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. तर प्रमुख मार्गदर्शक घनसावंगी शहरातील प्रसिद्ध कापड व्यापारी आशिष डुंगरवाल हे होते.यावेळी उपस्थित कॉलेजचे प्रा. वर्षा धाईत , प्रा लक्ष्मण गोरे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक राजेंद्र सानप यांनी केले.

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-३०५ दि.१८.०८.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान गजानन सर्जेराव भोसले, रा.माहेर मायगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रूपाली गजानन भोसले | मुलगी | २२.११.२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १८/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२२२ दि.०७.०८.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान जुलखर अब्दुल सलाम शेख रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत:**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जुलखर अब्दुल सलमान शेख | स्वत: | ०५.०१.१९९० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-४३९ दि.१९.०८.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान सुभाष विष्णु पवार रा.दुनगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत:**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुभाष विष्णु पवार | स्वत: | १०.०५.१९८८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १९/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२२४ दि.०७.०८.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान जावेद अब्दुल तांबोळी रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत:**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जावेद अब्दुल सलमान तांबोळी | स्वत: | ०४.१२.१९८४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२२१ दि.०७.०८.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान जफर अब्दुल सलाम तांबोळी, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत:**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जफर अब्दुल सलाम तांबोळी | स्वत: | १८.०१.१९८२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-४४१ दि.१९.०८.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान सुभाष विष्णु पवार रा.दुनगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुशिल सुभाष पवार | मुलगा | १४.०२.२००९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १९/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२२३ दि.०७.०८.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान अब्दुल सलाम मोहंम्मद जाफर तांबोळी रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत:**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अब्दुल सलाम मोहमंद जाफर तांबोळी | स्वत: | २१.०६.१९५७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-४४० दि.१९.०८.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान सुभाष विष्णु पवार रा.दुनगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शुभम सुभाष पवार | मुलगा | २३.०१.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १९/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# सौंदाना येथील जि.प. शाळेचे नवीन मंजूर बांधकाम येत्या सात दिवसात सुरु न केल्यास

## सी.ओ.च्या दालनात शाळा भरवणार - शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

बीड /प्रतिनिधी

बीड तालुक्यातील सौंदाना येथील जि.प. शाळेची अवस्था अत्यंत दयनीय झालेली आहे, सर्वत्र पडझड झालेली असुन, पावसाळ्यात हया खोल्या गळत असुन विध्यार्थ्यांनच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे. शाळेच्या नवीन इमारत बांधकामासाठी मंजुरी मिळालेली आहे.मात्र संबंधित गुत्तेदाराने शाळेचे काम सुरू केले नाही. येणाऱ्या सात दिवसात जर शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम सुरू केले नाही तर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात विद्यार्थ्यांचे वर्ग भरवले जातील असा थेट निर्वाणीचा इशारा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी दिला आहे.



शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करून दोन खोल्या दोन वर्षांपूर्वीच मंजूर करून घेतल्या. मात्र संबंधित ठेकेदाराने कामच चालू न केल्यामुळे शाळेची अवस्था जास्तच खराब झाली आहे.आज सौंदाना येथील रहिवासी व शिवसेना जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके व गावकरी यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांची जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात येऊन भेट घेतली असता सर्व गावकऱ्यांना सोबत घेऊन जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांची भेट घेऊन निवेदन दिले. येत्या सात दिवसांत काम चालू न केल्यास आपल्या दालनात शाळा भरविण्यात येईल असा इशारा जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी दिला आहे.यावेळी जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके,उपतालुकाप्रमुख महादेव परसकर,बाबु कुटे, रत्नाकर येवले,विशाल गायके , सुरेश सावंत, सतिश गायके ,गोकुळ गायके यांच्यासह सौंदाना येथील गावकरी व शिवसैनिक उपस्थित होते.

# जिल्ह्यात सुरु असलेल्या अतिवृष्टी संदर्भात आ.क्षीरसागरांची जिल्हाधिकार्यांसमवेत बैठक

## नुकसानीचे पंचनामे आणि उपाययोजना करण्याची केली प्रशासनाकडे मागणी

बीड (प्रतिनिधी):- मागील काही दिवसांपासून संपूर्ण बीड जिल्ह्यात अखंडित पाऊस पडत आहे. झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतातील पिकांबरोबरच पशुधनाचेही मोठे नुकसान झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी गावांना जोडणारे पूल वाहून गेले आहेत. या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासोबत बैठक घेऊन झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली.

गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण राज्यभरात संततधार पाऊस सुरू आहे. बीड जिल्ह्यातही




मागील काही दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे. अतिवृष्टीमुळे बीड मतदारसंघासह संपूर्ण जिल्ह्यात पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सोबत पशुधनाचेही नूकसान झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी गावांना जोडणारे अनेक पूल वाहून गेले आहेत. याबाबत प्रशासकीय स्तरावरून उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच शेतकरी बांधवांच्या झालेल्या नुकसानींचे तातडीने पंचनामे करावेत अशी मागणी यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली.

तेलगाव नाका अपघातासंदर्भातही घेतली संबंधित संयुक्त विभागांची बैठक

शनिवारी (दि.१९) रोजी बीड नगर परिषदेचे कर्मचारी शेख बाबू यांचा अपघाती मृत्यू झाला होता. बीड शहरातील तेलगाव रोडवर जलजीवन पाणीपुरवठा योजना आणि रस्त्याचे काम सुरू आहे. या रस्त्यावर एका बाजूनेच वाहतूक सुरू आहे. त्यामुळे याठिकाणी अपघात होत आहेत. काही दिवसांपूर्वीच एका तरूणाचाही या रस्त्यावर अपघाती मृत्यू झाला होता. आणि आता एका जेष्ठ नागरिकाचा बळी गेला आहे. त्याअनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरण व नगरपरिषद यांची संयुक्त बैठक घेऊन पुन्हा एखाद्या नागरिकाचा नाहक बळी जाणार नाही यासाठी उपाययोजना करा. असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.



# महामहोपाध्याय पुरस्कार डॉ. नंदकिशोर कपोते यांना प्रदान

नवी दिल्ली/प्रतिनिधी

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या वतीने प्रतिष्ठेचा व मानाचा महामहोपाध्याय पुरस्कार प्रसिद्ध व ज्येष्ठ कथक नर्तक, संगीत नाटक अकादमी अवार्डी डॉ.नंदकिशोर कपोते यांना सोमवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी ज्येष्ठ नर्तिका पद्मविभूषण, खासदार डॉ. सोनल मानसिंह यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब सुर्यवंशी, सचिव पं. सुधाकर चव्हाण, रजिस्ट्रार विश्वास जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. हा पुरस्कार सोहळा तेरणा ऑडिटोरियम नेरुळ, नवी मुंबई येथे उत्साहात संपन्न झाला. डॉ.नंदकिशोर कपोते यांना या पूर्वी भारत सरकार चा संगीत नाटक अकादमी राष्ट्रीय पुरस्कार माननीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते मिळाला आहे. तसेच याशिवाय महाराष्ट्र शासनाचा राज्य सांस्कृतिक पुरस्कार, शासनाचा डॉ बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार , पुणे महानगरपालिकेचा बालगंधर्व पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत.पं.विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या स्मरणार्थ हा महामहोपाध्याय पुरस्कार अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या दीक्षांत समारोहात देण्यात आला. महामहोपाध्याय पुरस्कार हा कलाक्षेत्रातील सर्वोच्च सन्मान मानला जातो.

# अंथरवण पिंपरी (तांडा) च्या साईराज पवारची नासा भेटीसाठी निवड

बीड /प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना इस्रो आणि नासा या अंतराळ संशोधन संस्थांना भेटीची संधी मिळण्यासाठी तीन टप्प्यात होणाऱ्या चाचणी परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. त्यापैकी एक लेखी व दुसरी ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेमध्ये अंथरवण पिंपरी (तांडा) ता. बीड येथील सहशिक्षक पवार गोविंद गिन्यानदेव यांचा चिरंजीव साईराज गोविंद पवार जुन्नर ता. जि. पुणे येथील जि.प. शाळेतून तालुक्यातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला व त्याची अमेरिकेतील नासा या अंतराळ संस्थेस भेटीसाठी



निवड झाली आहे. त्याच्या या निवडीबद्दल अंथरवन पिंपरी तांडा येथील व परिसरातील ग्रामस्थांनी, हितचिंतक, मित्रपरिवार, नातेवाईकांनी त्याच्या पुढील वाटचालीसाठी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# रमाई घरकुल योजनेतील जाचक अटी रद्द करा सर्वपक्षीय शिष्टमंडळाची मागणी

## बीड न.प.सिओ शैलेश फडसे यांनी तुघलकी फर्मान रद्द करावे - अशोक वीर

बीड /प्रतिनिधी

बीड शहरासह संपूर्ण राज्यभर रमाई घरकुल आवास योजना ही मागासवर्गीयांसाठी हक्काचे घर मिळावे म्हणून सुरू करण्यात आली आहे. रमाई घरकुल आवास योजनेच्या जीआर व नियमानुसार ज्या लाभार्थ्यांकडे नगरपालिकेचा मालकी हक्काचा पी.टी.आर आहे. त्या लाभार्थ्यांना घरकुल योजना लागू होते. व ते पात्र लाभार्थी असतात. बीड शहरात अनेक वर्षांपासून रमाई आवास घरकुल योजना चालू असून आज तागायत आहेत अनेकांनी या योजनेचा मालकी हक्काचा पीटीआर देऊन लाभ घेतला आहे.

बीड नगरपालिकेचे नव्याने रुजू झालेले सी ओ शैलेश फडसे यांनी आजबच कारभार सुरू केला आहे. त्यांनी महंमद तुगलकासारखे नवीन नियम नवीन कायदे आणले आहेत. ते तात्काळ रद्द करावेत.जागेची रजिस्ट्री पेपर, पी आर कार्ड, या गोष्टीची आवश्यकता नसताना मागणी करत आहेत. घरकुल हे फक्त मालकी हक्काच्या पी.टी.आर वर मिळते तोच सक्षम पुरावा असतो. तोच ग्राह्य धरून सर्व मंजूर लाभार्थ्यांना घरकुलाचा




निधी वितरित करावा अशा मागणीचे निवेदन बीड शहरातील सर्व पक्षीय शिष्टमंडळाने दिले आहे. तात्काळ या मागणीचा विचार करून बीड शहरातील रमाई घरकुल आवास योजनेच्या मंजूर लाभार्थ्यांना निधी वितरित करण्यात यावे अशी मागणी सर्वपक्षीय नेते मंडळीकडून करण्यात आली आहे. या शिष्टमंडळात अशोक वीर, बबन वडमारे, सनी वाघमारे, खुर्शीद आलम, विनोद सवाई, अशोक वाघमारे आदी उपस्थित होते.

# एकजुटीचं दर्शन: 'पोल चिठ्ठी'ने धनगर पिंपरी गावात शांततेची गुढी !

## तंटामुक्ती अध्यक्षपदी सुनील खांडेकर यांची निवड

अंबड /प्रतिनिधी

तालुक्यातील धनगर पिंपरी गावाने शांतता आणि एकोपा टिकवण्यासाठी एक अनोखा आदर्श घालून दिला आहे. संपूर्ण गावाने एकत्र येऊन, कोणत्याही वादाला वाव न देता, 'पोल चिठ्ठी' (झेश्र उहळींहूर) या पद्धतीचा वापर करून तंटामुक्ती अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवड केली आहे. या पद्धतीमुळे गावातील सामाजिक सलोखा आणि एकजूट पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे.

या विशेष प्रक्रियेत, सुनील भाऊ खांडेकर यांची तंटामुक्ती



अध्यक्ष म्हणून, तर कृष्णा वरे यांची उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाली. ही निवड कोणत्याही मतभेदांशिवाय आणि अत्यंत शांततेत पार पडली. या अनोख्या निवडीमुळे गावातील सर्व नागरिक एकत्र आले आणि त्यांनी सामाजिक एकतेची भावना जपली.

यावेळी उपसरपंच विलासराव कचरे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले. ग्रामविकास अधिकारी रवींद्र ढवळे यांनी सचिव म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडली. या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य संजय जाधव यांच्यासह गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवडणुकीमुळे होणारे वाद, मतभेद आणि मनभेद टाळून शांततेच्या मार्गाने विकास साधता येतो, हे धनगर पिंपरी गावाने आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमामुळे हे गाव जिल्ह्यासाठी नक्कीच एक प्रेरणास्थान बनले आहे.

# हेमा पिंपळे यांची राष्ट्रवादी (शरद पवार) गटाच्या राज्य प्रवक्ते पदी निवड



बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या सक्रिय कार्यकर्त्या म्हणून ओळख असलेल्या अॅड. हेमा पिंपळे यांची राज्य प्रवक्ते पदी निवड करण्यात आली आहे.

पक्ष संघटनेत सातत्याने काम करत कार्यकर्त्यांचा विश्वास संपादन केलेल्या पिंपळे यांच्या कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली. या निवडीसाठी पक्षाध्यक्ष आदरणीय शरदचंद्र पवार साहेब, खा.सुप्रिया सुळे, ज्येष्ठ नेते जयंत पाटील, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, राष्ट्रीय प्रवक्ते जितेंद्र आव्हाड तसेच रोहित पवार यांनी मान्यता दिली.या निवडीमुळे बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटातील कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सुभाष रोडवर अल्पवयीन मुलांना धूम्रपान करताना करताना रंगेहात पकडले

## नागरिकांच्या तक्रारीवरून दामिनी पथकाची दमदार कामगिरी !

बीड /प्रतिनिधी

दिनांक १८/०८/२०२५ रोजी दुपारी दामिनी पथक शहरामधे नेहमीप्रमाणे पेट्रोलिंग करीत असताना, सारडा कॅपिटल सुभाष रोड येथील स्थानिक लोकांनी फोनद्वारे माहिती दिली की, शहरात एका सार्वजनिक ठिकाणी काही मुले एकत्र जमा होवून सिगारेट, बीडी ओढून धुम्रपान करत असतात, त्यामुळे नागरीकांना त्रास होत आहे व याचा परिणाम नागरी वस्तीतील मुलांवर होवू शकतो व महिला, मुली यांचा सदर ठिकाणावरून येणे जाणे असल्याने त्या घाबरत आहेत, त्यावरून दामिनी पथकाने त्या ठिकाणी जाऊन खात्री केली असता, तेथे त्यांना बरेच मुलं सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करताना मिळून आले.

दामिनी पथकाने त्यांना ताब्यात घेवून त्यांना बीड शहर पोस्टे ला नेवून विचारपुस केली असता, त्यात काही अल्पवयीन मुलांचा समावेश होता. म्हणून त्यांच्या आई-वडिलांना पोस्टेला बोलावून घेतले व सर्व हकीकत



सांगितली. अल्पवयीन मुलांना समज देऊन पालकांच्या ताब्यात दिले. व इतर नऊ मुलांवर मुंबई पोलीस अधिनियम अन्वये कारवाई केली. तरी आपापल्या मुलांवर पालकांनी लक्ष द्यावे व तो व्यसनाधीन होणार याची काळजी घ्यावी.सदर कारवाई पीएसआय पल्लवी जाधव, सहायक फौजदार मीरा रेडेकर,पोलीस हवालदार शोभा जाधव व पोलीस शिपाई गजानन चौधरी सर्व नेमणूक दामिनी पथक बीड यांनी केली.

### हर घर तिरंगा अभियानांतर्गत व्ही.जी. आवाड यांच्या हस्ते

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये ध्वजारोहण

बीड /प्रतिनिधी

बीड येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी हर घर तिरंगा अभियानांतर्गत भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त या विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक व्ही.जी. आवाड यांच्या शुभहस्ते आणि या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ध्वजारोहण कार्यक्रम उत्साह मध्ये संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे प्रारंभी महात्मा गांधी आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांची प्रभात फेरी शालेय परिसरातून काढण्यात आली. याप्रसंगी पसायदान चे सामूहिक गायन करण्यात आले. विद्यार्थ्यांची सामूहिक कवायत आणि डंबेल्स कवायत या विद्यालयाचे शिक्षक यु.बी. पवळ यांच्या मार्गदर्शनाखाली नयन मनोहर संपन्न झाली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्तीपर गीताचे गायन केले.या कार्यक्रमाचे संचालन सांस्कृतिक व प्रमुख विजय देशमुख, प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस. वाघमारे यांनी केले. याप्रसंगी आनंद छात्रालयाचे अध्यक्ष डी.व्ही. खरसाडे, या विद्यालयाचे शिक्षक आर.बी घुले, श्रीमती एन.जी. मुंडे, शिक्षकेतर कर्मचारी एल.बी. हजारे, भारत कोळेकर आणि एस.एस. गायकवाड, बहुसंख्य विद्यार्थी, पालक, नागरिक उपस्थित होते.



हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# बीड मधील शेतकरी संकटात; केंद्राकडून मदतीचा हात द्या

## खा.बजरंग सोनवणेंनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून केली मागणी



बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून पाऊस जोरदार हजेरी लावत असून जिल्ह्या मधील बहुतेक सर्वच महसुल मंडळामधे अतिवृष्टीची नोंद झालेली आहे.शेतातील पिके पाण्यात आहेत. दोन दिवसांपुर्वी खा.बजरंग सोनवणे यांनी थेट शेतात जावून नुकसानीची पाहणी केली होती.आज दि.१९ रोजी केंद्रीयमंत्री अमित शहा यांची दिल्ली येथे भेट घेवून अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून मदतीचा हा द्यावा अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली.


बीड जिल्ह्यातील शेतकरी बांधवांवर अतिवृष्टीमुळे मोठे संकट ओढावले आहे. राहती घरे,पीक, पशुधन,शेती,जमीन तसेच फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे.या नुकसानीची दखल घेऊन शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून तातडीने मदत मिळावी,यासाठी खा.सुप्रिया सुळे यांच्या सोबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.मागीलकाही दिवसांपासून जिल्ह्यात संततधार आणि मुसळधार पावसाची नोंद झालेली असून जिल्ह्यातील नद्यांना पूर गेलेला आहे.नदीपात्रा पासून एक किलोमीटर अंतरापर्यन्त पिके पाण्याखाली आहेत. पावसामुळे पिकांचे, शेतीचे आणि घरांची पडझड होवूनही मोठी हानी झालेली आहे.केज तालुक्यातील काही गावात मांजरा नदीच्या पात्रातील पाणी शिरले होते.या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे आणि शेतीचेही नुकसान झाले होते. यानंतर तातडीने खा.बजरंग सोनवणे यांनी पूर्वनियोजीत दौरा रद्द करून शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतात जावून पिकांची आणि नुकसानीची पाहणी केली होती.शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांनी धीर दिला होता.यानंतर मुख्यमंत्री आणि कृषीमंत्री यांना निवेदन पाठवून पंचनामे करणे व मदतीची मागणी केली होती.आज दि.१९ रोजी केंद्रीयमंत्री अमित शहा यांची भेट घेवून केंद्र सरकारच्या वतीने तातडीने मदत द्यावी अशी मागणी केली. दरम्यान,गेल्या ४-५ दिवसांपासून झालेल्या संततधार पावसामुळे बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्रच शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उपजाऊ मातीसह जमीन वाहून गेल्यामुळे पुढील काळासाठी काही क्षेत्र उजाड झाली आहेत.काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे तसेच गुरे दगावले असल्याची माहिती येत आहे.या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. झालेल्या नुकसानीचे फोटो व व्हिडिओ स्वत: कडे जतन करून ठेवावेत,तसेच नुकसानी बाबतची तक्रार फोटो, व्हीडिओसह तहसीलदार यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर करावी.या प्रक्रियेत कुठलीही अडचण आल्यास माझ्या कार्यालयाशी संपर्क साधून मदत घ्यावी असे आवाहनही खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील शेतकरी व नागरिक यांना केले आहे.

# कव्हळे कुटूंबाच्या दोन्ही कन्यांचे स्वप्न झाले साकार

## कव्हळे कुटुंबातील दुहेरी आनंद;समाजासाठी प्रेरणादायी कार्य !

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील कारखेल बुद्रुक सारख्या छोट्याशा खेड्यातील कव्हळे कुटुंब आज आनंदाच्या शिखरावर आहे. ज्याठिकाणी जन्मतःच अठरा विश्व दारिद्र्याशी सामना करत जगावं लागतं, ऊसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बीड मधील हे कुटुंब आज संपूर्ण समाजाला प्रेरणा देत आहे. या कुटुंबाचे कर्तृत्ववान आधारस्तंभ भाऊसाहेब शांताराम कव्हळे यांनी स्वतः गरिबीतून शिक्षण घेऊन भारतीय सैन्यात भरती होऊन देशसेवेचे ऋण फेडले. त्यानंतर महसूल विभागात सेवा करताना त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी प्रचंड संघर्ष केला. त्या संघर्षाचे गोड फळ आज दुहेरी स्वरूपात मिळाले आहे.चार वर्षांपूर्वी मोठी कन्या प्रीती कव्हळे हिची निवड शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस साठी झाली होती. तेंव्हा धाकटी प्रेरणा हिने डोळे मिटून एकच शपथ घेतली होती की, मी ही डॉक्टर होणारच! आज त्या जिद्दीला यश आले आहे. प्रेरणा कव्हळे हिचीही निवड शासकीय





वैद्यकीय महाविद्यालय धाराशिव येथे एमबीबीएस साठी झाली आहे.

आज भाऊसाहेब कव्हळे व त्यांच्या कुटूंबियांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे. एकेकाळी हातात रायफल घेऊन देशरक्षण करणारे भाऊसाहेब आता मुलींच्या हातात स्टेथेस्कोप पाहून अभिमानाने नतमस्तक झाले आहेत. देशसेवा, जनसेवा झाल्यानंतर आता कव्हळे कुटुंबीयांच्या मुली आरोग्य सेवेचे व्रत पाळणार आहेत. बेटी बचाओ, बेटी पढाओ या राष्ट्रीय घोषणेचं जिवंत उदाहरण म्हणजे हे कव्हळे कुटुंब. रुग्णसेवेचे स्वप्न उराशी बाळगून दोन्ही कन्या एमबीबीएस करत आहेत. ज्यांच्या स्वप्नात जिद्द असते ते यशाची शिखरे काबीज करतातच. कारखेल बुद्रुकसारख्या छोट्याशा खेड्याने दोन एमबीबीएस कन्या घडवल्या आहेत ही केवळ कुटुंबाचीच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्याची शान ठरली आहे. त्यांच्यावर सध्या जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## घनसावंगी तालुक्यातील झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानीचे पंचनामे करा : नसीर शेख यांची मागणी

घनसावंगी /प्रतिनिधी

दि.१६,१७ , ऑगस्ट रोजी घनसांवगी तालुक्यामध्ये सर्व महसुली मंडळामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये अतिवृष्टी झाली त्यामुळे खरीप पिकाची खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, फळ पिकाचे नुकसान झाले, शेतामध्ये पाणी पिकांमध्ये साचले आहे कसले ही प्रकारचे उत्पन्न शेतकऱ्यांना होणार नाही, काही ठिकाणी जमीनही खरडून गेली आहे त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे म्हणून त्वरित पंचनामे सरसकट करून शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी, अशी मागणी सिने अभिनेते नसीर शेख यांनी मा.तहसीलदार, व मा.तालुका कृषी अधिकारी, यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे , त्यावेळी, नारायण मते, प्रदीप वराडे, मारुती सावंत,अरुण लोंढे, संभाजी जाधव, अनिरुद्ध साबळे, महादेव जाधव, शरद पवार, प्रकाश म्हस्के, सादिक पटेल, अन्वर पठाण चेअरमन आधी शेतकरी उपस्थित होते

# अतिवृष्टीग्रस्त भागात पंचनामे करून नुकसान भरपाईची मागणी

## किसान सभेचे महसूल व कृषी विभागाच्या निवेदन

परळी (प्रतिनिधी)

तालुक्यात दि १७, १८ रोजी नागापूर, मोहा, सिरसाळा, पिंपळगाव गाडे या महसूल मंडळ व गावात अतिवृष्टीची नोंद झाली असून शेकडो हेक्टरवरील पीक पाण्याखाली गेली आहेत. शेतपिकांचे मोठे नुकसान झाले असून या महसूल मंडळात व गावात झालेल्या पिकांच्या नुकसानाचे पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी किसान सभेकडून करण्यात आली असून या बाबतचे निवेदन तहसील कार्यालय व तालुका कृषी कार्यालयात देण्यात आले आहे.



परळी शहर व तालुक्यात दि १५ ऑगस्ट पासून सूर्यदर्शन न घडता सातत्याने पावसाने जोर पकडला आहे. खरीप हंगामातील जून व जुलै हे दोन महिने कोरडे गेले असल्यामुळे पेरणीत विस्कळीतपणा व पीक परिस्थिती ही समाधानकारक नव्हती. अशा विदारक परिस्थितीत मागील चार-पाच दिवसापासून लागून राहिलेल्या पावसामुळे जागोजाग शेतात पाणी साचले आहे. पिके पाण्याखाली जाऊन पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. दि १७ व १८ ऑगस्ट रोजी सिरसाळा महसूल मंडळात १२२.३, गाडे पिंपळगाव महसूल मंडळात १२५.५, नागपूर महसूल मंडळात ९२.५ व मोहा महसूल मंडळात अश्याच प्रमाणात अतिवृष्टी झालेली आहे. तालुक्यातील अनेक लघु व मध्यम सिंचन तलाव ओसंतडून वाहू लागले आहेत. नद्या-नाल्यांना पूर आलेला असून आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांचे उभे पीक पाण्यात गेल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन शेतकरी हवालदिल झाले आहेत. अशा परिस्थितीत तहसील प्रशासन व कृषी विभागाने या भागात तात्काळ पीक नुकसानीचे पंचनामे करून राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीतून शेतकऱ्यांना मदत करून दिलासा देण्याची अखिल भारतीय किसान सभा परळीचे

तालुका अध्यक्ष कॉ.मुक्तेश्वर कडबाने तालुका सचिव कॉ.भगवान बडे, कॉ.सिद्राम सोळंके, कॉ.विशाल देशमुख, ज्ञानेश्वर सोनटक्के, दत्ता गव्हाणे, धनंजय सोळंके,

# होळ येथे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे यांचा सेवापूर्ती निमित्त गौरव

## जंगी मिरवणूक काढून नागरी सत्कार; माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे यांची विशेष उपस्थिती

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील होळचे सुपुत्र,राज्याच्या व्हीआयपी सुरक्षा विभागाचे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले.त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सेवापूर्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन रविवारी दि.१७ आगष्ट रोजी सकाळी ११ वाजता होळ येथील हनुमान मंदिरात करण्यात आले.या सोहळ्यापूर्वीग्रामस्थांनी जंगी मिरवणूक काढून त्यांचे उस्फूर्त स्वागत केले.

कार्यक्रमाला राजस्थान चे माजी मुख्यन्यायमूर्ती संभाजीराव शिंदे विशेष अतिथी म्हणूनउपस्थित होते.सोहळ्याचे अध्यक्षस्थान सरपंच अश्विनीताई शिंदे यांनी भूषविले.प्रमुख अतिथी मध्ये मांजरा साखर कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक दत्ता शिंदे,माजीसरकारी वकील ॲड.प्रकाश शिंदे,पुणे सीआयडीचे माजी पोलीस उप अधीक्षक दीपक शिंदे,



केंद्रप्रमुख रमेशकांबळे, माजीप्राचार्य डॉ.ज्ञानोबा सरवदे,बारामती ॲग्रोचे प्रबंधक अंकुश ढवारे, मुख्याध्यापक धर्मराज शिंदे,हृदयरोगतज्ज्ञ डॉ.नवनाथ घुगे, डॉ.गणेश ढवारे यांचा समावेश होता.यावेळी मान्यवरांचा होळ ग्रामस्थांच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांच्या पुढाकाराने पार पडलेल्या या सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने हजेरी लावली. होळ गावातील दोन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा झालेला हा गौरव सोहळा ग्रामस्थांसाठी अभिमानाचा क्षण ठरला.यावेळी जिल्हा तील राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरही यावेळी उपस्थित होते.

आठवणींना उजाळा

या सोहळ्यात संभाजीराव शिंदे व अंकुशराव शिंदे यांनी आपल्या मनोगतातून शालेय जीवनापासून ते आजवरच्या प्रवासातील अनेक आठवणींना उजाळा दिला.दोघेही बनेश्वर शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थीअसल्याने शिक्षण संस्थेबद्दल व होळच्या मातीतून मिळालेल्या संस्कारां बद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.त्यांच्या भाषणातून गावाशी असलेली घट्ट नाळ प्रकर्षाने जाणवली.



## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बीड विधानसभा अध्यक्ष योगेश भैय्या क्षीरसागर यांनी युवानेते संदीप जाधव यांची सदिच्छा भेट

पाटोदा (प्रतिनिधी) बीड अजित दादा पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष योगेश भैय्या क्षीरसागर यांनी युवानेते संदीप जाधव यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत विविध विषयावर चर्चा केली यावेळी नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, पत्रकार कादरभाई मकरानी, पत्रकार गणेश शेवाळे यांच्यासह इतर मान्यवर मंडळी उपस्थित होते

# गंगाखेडचे राजे संभाजी गोविंदा पथक प्रथम पुर्णेतील शिवसेनेच्या दहीहंडी महोत्सवाची सांगता

## जय नृसिंह गंगाखेड द्वितीय,जय बजरंग लोहा तृतीय

पूर्णा (प्रतिनिधी )

येथिल शिवसेना शिंदे गटाच्या वतीने आयोजित भव्य दहीहंडी महोत्सवातील दहीहंडी गंगाखेडच्या राजे संभाजी गोविंदा पथकाने फोडून प्रथम क्रमांक पटकावला आहे.नागरिकांनच्या अलोट गर्दीत पार पडलेल्या या महोत्सवात सुमारे दीड लाख रुपयांची पारितोषिके गोविंदा पथकांनी पटकावली आहेत.

पूर्णा शहरातील जूना मोंढा मैदानावर रविवारी (ता.१८) रोजी शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख विशाल कदम यांच्या नेतृत्वाखाली गणेश कदम,सचिन कदम, यांनी भव्य दहीहंडी महोत्सवाचे आयोजन केले होते.यावेळी माजी नगराध्यक्ष उत्तमराव कदम व माजी नगराध्यक्ष सत्यनारायण कुल्थे यांच्या प्रमुख उपस्थितीत पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते दहीहंडी फोडून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर ऑपरेशन सिंदूर मधे सहभागी सैनिक मुंजाजी सुंदरराव कदम, भाजपचे जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, गणेशराव अंभोरे, एन. डी. देशमुख, क्षितिज चौधरी, पृथ्वीराज चौधरी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा आयोजक विशाल कदम, गणेश कदम, सचिन उर्फ पप्पू कदम, एकनाथ लोखंडे, प्रकाश कराळे, नारायणराव पिसाळ,प्रशांत कापसे,शेख लतीफ ताज,रौफ कुरेशी,अमजद नुरी,ड.विशाल किरडे, सुनील इंगोले, गणेश कदम,प्रक्षित सवनेकर,लक्ष्मण कदम, भगवान सोळंके,माऊली कदम, अंकित कदम, गोविंद पळसकर,गोपाळराव कदम सावकार उपस्थित होते. यावेळी बोलताना मेघना बोर्डीकरांनी पुर्णा शहर वासीयांसह, गोविंदा पथकास शुभेच्छा दिल्या. सदरील दहीहंडी उत्सवात मराठवाड्यातील नामवंत दहीहंडी पथक सहभागी झाले होते. या स्पर्धेत प्रथम पारितोषीक ५५००० रुपये व सन्मान चिन्ह गंगाखेड येथील राजे संभाजी गोविंदा पथकाने



पटकावले , व्दितीय पारितोषीक ३१००० रुपये व सन्मानचिन्ह गंगाखेड येथील जय नृसिंह गोविंदा पथक , तृतीय पारितोषीक २१००० रुपये व सन्मान चिन्ह लोहा येथील जय बजरंग गोविंदा पथक यांनी पटकावले. यावेळी पंच म्हणून, माणिक कदम, संभाजी शेवटे, बालाजी वाघ, कैलास टेहरे, योगेश जोशी, प्रकाश रौंदळे, सज्जन जयस्वाल, धरमसिंह बायस, सतीश बरकुंटे यांनी काम पाहिले. पारितोषिक वितरण समारंभास पोलिस निरीक्षक विलास गोबाडे, शिवराम भंगे, भगवान सोळंके, रवि गायकवाड, विजय यादव सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ शिंदे, गजानन पाटील यांची उपस्थिती होती. मुंबई येथील प्रतिक्षा डान्स ग्रुपने कार्यक्रमाची रंगत वाढवली. सुत्रसंचालन जगदीश जोगदंड यांनी केले. दिनेश पवार यांनी आभार मानले

# स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही
# सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ राजेश इंगोले



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही तर आपल्या हक्कांसोबत आपले कर्तव्य पार पाडणे हा होय असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ राजेश इंगोले यांनी केले. व्यंकटेश विद्यामंदिर नारायण इंग्लिश स्कूल येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते अध्यक्षीय स्थानावरून म्हणून बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्रमुख व्याख्यता डॉ राजेश इंगोले यांच्या हस्ते ध्वजारोहणाने व महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

यावेळी मंचावर संस्थेचे प्राचार्य धनंजय शिंदे,नर्सिंग स्कूलचे विभाग प्रमुख प्रा सूर्यवंशी सर, नारायण स्कूलचे मुख्याध्यापक ठोंबरे सर, चौधरी सर,गाढवे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी बोलताना डॉ राजेश इंगोले यांनी भारताला मिळालेले स्वातंत्र्य हे अनेक क्रांतिवीरांच्या बलिदानाने मिळालेले आहे.स्वातंत्र्या मागचा उद्देश गुलामगिरी नष्ट व्हावी हा होता. या देशातील प्रत्येक माणसाला स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय मिळाला पाहिजे हे स्वप्न समस्त महापुरुषांचे होते. दुर्दैवाने देशांमध्ये जातीच्या, धर्माच्या आधारे, लिंगभेदाच्या आधारे गरिबी श्रीमंतीच्या आधारे देश विभागला जात आहे. महापुरुषांच्या स्वप्नातला स्वतंत्र भारत आणि आजचा भारत यामध्ये कसलाही ताळमेळ बसत नाही.श्रीमंत अधिक श्रीमंत होत चालला आहे,गरीब अधिक गरीब होत चाललेला आहे, जाती–धर्माचे कट्टर बीच माणसांमध्ये लावले गेले आहे. त्यामुळे समाजामध्ये उभी फूट पडत आहे. हे चित्र खचितच स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या क्रांतिकारकांना अपेक्षित नव्हते . आजच्या या स्वतंत्र भारतात प्रत्येक जणाला आपल्या हक्कांची जाणीव आहे परंतु देशाप्रती समाजाप्रती आपले कर्तव्य काय असावे याबाबत कोणीही विचार करताना दिसत नाही, ही मिळालेल्या स्वातंत्र्याची शोकांतिका आहे असे सांगत देशातील नागरिकांनी आपल्या हक्कांसोबतच कर्तव्याप्रतिही जागृत असणे गरजेचे आहे असे स्पष्ट केले.

देशाला इंग्रजांच्या गुलामगिरीतून तर मुक्तता मिळाली परंतु जनतेला मानसिक गुलामगिरीतून मुक्तता मिळाली नाही ही खेदाची बाब आहे असे स्पष्ट करत लोकशाहीमध्ये जनतेचा राजा हा राणीच्या पोटी जन्माला येणार नाही तर लोकांनी केलेल्या मतदानातून जन्माला येईल अशी व्यवस्था संविधान निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केली. परंतु देशांमध्ये पिढ्यानपिढ्या अनेक घराणे राजसत्ता उपभोगत आहेत. याचा अर्थ सर्वसामान्य जनतेच्या मनातून ही मानसिक गुलामगिरी गेली नाहीआणी लोकशाही रुजली नाही हे अधोरेखित होते. लोकशाहीमध्ये मतदारांनी आपले प्रतिनिधी पाठवताना आपल्या प्रश्नांना आपल्या समस्यांना जो योग्य न्याय देऊ शकतो असे प्रगल्भ प्रतिनिधी पाठविणे गरजेचे आहे तरच भारतातील लोकशाही जिवंत राहील अन्यथा आपणही भरकटु शकतो.

पुढे बोलताना डॉ राजेश इंगोले यांनी मनाचे स्वातंत्र्य ही व्यक्तीला निरोगी आणि निकोप बनविण्यासाठी आवश्यक असल्याचे मत व्यक्त करत ज्या माणसाने आपल्या मनावर नियंत्रण मिळवले त्याने खरा अर्थाने स्वातंत्र्य मिळवले असे सांगितले कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य धनंजय शिंदे यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रत्येक व्यक्तीने समाजाच्या, देशाच्या उत्कर्षाप्रती कर्तव्यबद्ध राहिले पाहिजे आणी स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणले पाहिजेत असे आवाहन केले.कार्यक्रमाच्या सुरवातीला कुमारी जोगदंड, कुमारी हंडीबाग, ची प्रद्युमन जगताप यांनी देशभक्तीपरगीते गाऊन उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री घाडगे सर तर आभार प्रदर्शन चौधरी सर यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या शिक्षक व कर्मचारी वृंदाने परिश्रम घेतले.

## केजच्या नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड यांना डॉक्टरेट पदवी प्रदान




केज/प्रतिनिधी

केजच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई प्रदीप बनसोड यांना युनिव्हर्सिटी ऑफ टोलोसा,मेक्सिको यांच्या मार्फत मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. सीताताई बनसोड या वयाच्या २५ व्या वर्षा पासून समाज कार्यात झोकून देऊन कार्य करत आहेत,ताईंच्या कामाची सुरुवात बजरंग नगर केज येथे शाळाबाह्य मुलांना मुख्य प्रवाहात आणून शिक्षणाची गोडी निर्माण करण्याचं काम केले. महिला बचत गटातून महिलाना स्वयं रोजगार आणि आत्मनिर्भर करण्याचे काम सीताताई यांनी केले, शेतकरी,शेतमजूर, महिलांचे व बालकांचे प्रश्नावर ताईने नाविन्य पूर्ण काम केले आहे, बालकल्याण समिती च्या माध्यमातून पूर्ण बीड जिल्ह्यात ताईने आपल्या कामाचा नाव लौकिक मिळवला आहे.मानवी हक्क अभियान मध्ये काम करता असताना दलीत, महिला आणि समाजाच्या शेवटच्या घटका पर्यंत काम करून समाजाच्या शेवटच्या घटकाला न्याय मिळेल या शुद्ध हेतुने ताई काम करत आहेत,रोटरी क्लब ऑफ केज च्या पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून सुद्धा ताईंचे काम उल्लेखनीय आहे,केज शहराच्या नगराध्यक्ष पदी निवड सक्षम महिला नगराध्यक्ष म्हणून त्याचं काम अतिशय उल्लेखनीय आहे.सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात मागील २५ वर्षात झालेल्या कामाची पावती म्हणून युनिव्हर्सिटी ऑफ टोलोसा,मेक्सिको यांच्या मार्फतमिळालेली मानद डॉक्टरेट पदवी म्हणजे सामान्य कार्यकर्त्याच्या कार्याला मिळालेला न्याय आहे, या मिळालेल्या डॉक्टरेट चा सर्वसामान्य व्यक्ती कडुन उत्साहात स्वागत होत आहे.आता त्यांना डॉ.सिताताई बनसोड या नावाची ओळख मिळाली आहे.



## गोंदी येथे गुरुवारी इंदोरीकर यांचे किर्तन

प्रतिनिधी:– शहागड

अंबड तालुक्यातील गोंदी येथे गुरुवारी दि. २१ ऑगस्ट २०२५ रोजी गोंदी येथील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. राजेंद्र महाराज वाघमारे यांच्या मातोश्री वै. गं. भा. सागरबाई मोहनराव वाघमारे यांच्या पुण्यस्मरण निमित्त महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार, विनोदाचार्य ह. भ. प. निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांचे हरी किर्तन सायंकाळी ७ ते ९ यावेळेत होणार आहे. तरी गोंदी आणि परिसरातील भाविक भक्तांनी या कीर्तनाचा लाभ घ्यावा असे ह. भ. प. राजेंद्र महाराज वाघमारे गोंदीकर यांनी सांगितले आहे.

## मौजे कोल्हेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात संपन्न



केज/प्रतिनिधी

दि.१८आगष्ट २०२५ रोजी ह.भ.प.ज्ञानेश भक्त व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड (गुरुजी)श्रीक्षेत्र भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्था होळ,यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेला मौजे कोल्हेवाडी ता.केज येथील अखंड हरिनाम सप्ताह,वर्ष ३२ वे दिनांक ११ ऑगस्ट ते १८ ऑगस्ट २०२५ या कालावधीत मोठ्या उत्साहात पार पडला.

यावर्षीच्या सप्ताहाचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे,श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा होय.भागवताचार्य ह.भ.प.श्रीराम महाराज चोले यांच्या मधुर वाणी तून गावकऱ्यांना सर्व प्रथम भागवत कथा श्रवण करण्याचे भाग्य लाभले.विशेष करून या भागवत कथेला महिला मंडळींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.तसेच तरुण युवकांनी यावर्षीच्या या कार्यक्रमात वाढता सहभाग नोंदवला.

परंपरेनुसार याही वर्षी व्याकरणाचार्य ह.भ.प. अर्जुन महाराज लाड (गुरुजी)यांचीकाल्याच्या कीर्तनाची सेवा मोठ्या उत्साहात पार पडली. या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील व परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाप्रसादा नंतर सप्ताहाची सांगता झाली.

# आष्टीच्या मिर्झा अरहानची गगन भरारी
## भारत सरकारच्या नामांकित एनआयटीमध्ये रिसर्च इंजिनिअरिंगसाठी झाली निवड

आष्टी (प्रतिनिधी)

परिस्थिती कशी असो मात्र परिस्थितीवर मात करून यशाच्या उच्च शिखरावर पोहोचवण्याचा धाडस आणि ध्येय जर असेल तर ते यश नक्कीच मिळते याचा प्रत्यय आष्टीच्या मिर्झा अरहानच्या रूपातून आला असून आष्टीच्या शिरपेचा त आणखी एक मानाचा तुरा मिर्झा अरहानने रोवला असून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या मुलाने यशाचे उत्तुंग शिखर सर केले आहे. नुकतीच झालेल्या भारत सरकारच्या नामांकित एनआयटी रिसर्च इंजीनियरिंग साठी त्याची निवड झाली आहे.

घरची परिस्थिती गरीब, वडील मजुरीवर, आई गृहिणी अशा वेळी शिक्षणाचे स्वप्न कसे पूर्ण करायचे असा प्रश्न मिर्झा अरहान मुर्तजा बेग या तरुणाच्या समोर होता. पण मनातल्या जिद्दीला, आई – वडिलांच्या प्रोत्साहनाला आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला आधार देत त्याने आज देशभरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. मिर्झा अरहान याची भारत सरकारच्या एनआयटी (नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी) या नामांकित संस्थेत रिसर्च सायंटिस्ट इंजिनिअरिंग अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. केरळमधील कोझिकोड येथे तो शिक्षण घेणार आहे.

केवळ २०० ते ३०० विद्यार्थ्यांची निवड वा अभ्यासक्रमासाठी देशभरातून होते. अशा विद्यार्थ्यांमध्ये अरहानची निवड होणे हे आष्टी तालुक्यासाठी अभिमानास्पद आहे. मिर्झा अरहानचा जन्म आष्टी येथे झाला. वडील मुर्तजा बेग हे एका छोट्याशा गोळी सेंटरमध्ये कामगार. आई गृहिणी. घरच्या आर्थिक



परिस्थितीमुळे आपल्यालाही लहानपणापासून कामाला जावे लागेल असे त्याला वाटत होते. पण शालेय जीवनापासून विज्ञानाची गोडी त्याला लागली. नवीन प्रयोग करणे, घरच्या वस्तूंचा वापर करून छोट्या यंत्रसामग्री तयार करणे हे त्याचे छंद.

प्राथमिक शिक्षण त्याने गंगुबाई विद्यालयात, तर पुढील शिक्षण पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय, आष्टी येथे पूर्ण केले. दहावीला तब्बल ९३ टक्के गुण मिळवत त्याने आपली गुणवत्ता सिद्ध केली. या यशामुळे आई – वडिलांचा विश्वास दुणावला. त्यांनी कष्ट करून मुलाला शिकवण्याचा निर्धार केला. एनआयटीसाठी देशभरातून केवळ २०० विद्यार्थ्यांचीच होत असते निवड यात अरहानची निवड ही फार मोठी अभिमानाची व अभिनंदनाची बाब ठरली आहे.

आ. सुरेश धस यांच्याकडून कौतुक, इतर तरुणांसाठी प्रेरणादायी

घरच्या आर्थिक अडचणी, कर्जबाजारीपणा, प्रतिकूल परिस्थिती यावर मात करून अरहानने सिद्ध केले की, जिद्द, मेहनत आणि आई – वडिलांचे आशीर्वाद असेल तर यश मिळवता येते, अशी प्रतिक्रिया आ. सुरेश धस यांनी दिली आहे.

जेईईत १७ हजारावी रँक अरहान आपल्या काकांकडे छत्रपती संभाजीनगर येथे राहायला गेला. तेथे महाराष्ट्र कॉलेज ऑफ सायन्समधून अकरावी – बारावी पूर्ण केली. बारावीत असतानाच त्याने कठीण समजली जाणारी जेईई परीक्षा देण्याचा निर्धार केला. जानेवारी २०२५ मध्ये पहिल्या टप्यात तब्बल ९८ पर्सेंटाइल गुण मिळवले. मे महिन्यात दुसऱ्या टप्यातील जेईई अँडव्हान्स परीक्षा उत्तीर्ण होत ऑल इंडिया रँक १७ हजार व कॅटेगरी रँक ४ हजार मिळवून तो आता एनआयटी मध्ये दाखल होणार आहे.




## नुकसानीचे शासनस्तरावर पंचनामे करुन शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत करावी –व्यंकटराव पाटील गोरेगावकर

मुक्रमाबाद /प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद परीसरात आज दि.१७/०८/२०२५ रोज रविवारी मध्यरात्री ढगफुटी होऊन झालेल्या अतिवृष्टीमुळे नदी नाल्यालगत असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतीपिंकाचे, खरडून गेलेली जमीन, शेती औजारे व आखाड्यावरील असलेले जनावरे मोठ्या प्रमाणात वाहून जाऊन झालेल्या नुकसानीचे शासनस्तरावर पंचनामे करुन शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत करण्यासाठी मा. कर्डीले साहेब जिल्हाधिकारी नांदेड यांना लोहा–कंधार विधानसभेचे मा.आ. प्रतापराव पाटील चिखलीकर साहेबांनी सकाळी मुंबईहून दुरध्वनी वरुन सांगितले त्याअनुषंगाने मा.व्यंकटराव पाटील गोजेगावकर साहेबांनी मा.जिल्हाधिकारी नांदेड यांना त्यांच्या दालनात लेखी निवेदन देऊन झालेल्या नुकसानीचे त्वरीत पंचनामे करुन मदत देण्यासाठी विनंती केली

# हे तर संगमनेरला बदनाम करण्याचे षडयंत्र;
# आमदार सत्यजीत तांबे मामा थोरातांबरोबर मैदानात

**अहिल्यानगर। प्रशांत बाफना**
**जिल्हा प्रतिनिधी**

**संगमनेरमधील कीर्तनात झालेल्या राजकीय गोंधळानंतर आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी तापल्या आहेत. संग्रामबापू भंडारे महाराज यांची काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरातांवर टीका करताना, जीभ घसरली. नथूरामजी गोडसे होण्याची भाषा वापरली. भंडारे महाराज यांच्या भाषेवरून राज्यातील संपूर्ण काँग्रेस, थोरातांसाठी मैदानात उतरली आहे. तसेच थोरातांचे भाचे तथा नाशिक पदवीधरचे आमदार सत्यजीत तांबे यांनी कीर्तनकार संग्रामबापू भंडारे महाराज यांचा टीकेला प्रत्युतर दिले आहे.**

आमदार सत्यजीत तांबे मामा थोरातांबरोबर मैदानात येत, तथाकथित कीर्तनकाराची टीका ही राजकीय तर आहेच, पण संगमनेरच्या सामाजिक घडीला बदनाम करणारी आहे, असे सुनावणारे ट्विट केलं आहे. सहकार, शिक्षण, कृषी, सांस्कृतिक सगळ्याच क्षेत्रात अग्रेसर असलेल्या संगमनेरचे नाव बदनाम करण्याचा काही घटना मागील काळात सातत्याने सुरू असल्याकडे देखील आमदार तांबेंनी लक्ष वेधलं. सत्यजीत तांबे यांनी म्हटले आहे की, बाळासाहेब थोरातसाहेबांवर टीका करताना विरोधक सुध्दा जपून शब्द वापरतात. त्यामुळे संत–महात्म्यांची परंपरा असलेल्या महाराष्ट्रात स्वतःला कीर्तनकार म्हणून घेणाऱ्या एका उध्दट व्यक्तीने त्यांच्या विषयी जे काही बोलले ते महाराष्ट्रातील कोणत्याही वारकरी संप्रदायातील कीर्तनकारांना आवडलेले नाही.

सहकार, शिक्षण, कृषी, सांस्कृतिक सगळ्याच क्षेत्रात अग्रेसर असलेल्या संगमनेरचे नाव बदनाम करण्याचा घटना गेल्या काही दिवसांपासून सातत्याने सुरू आहेत. तशा त्या सुरू करण्यात आल्यात. या घटना फक्त राजकीय नाहीत, किंवा फक्त थोरातसाहेबांशीच संबंधित नाही, मध्यंतरी संगमनेरचे नाव देशभर प्रसिद्ध करणाऱ्या एका उद्योगपतीला त्याने 'होर्डिंगमुळे शहराचे विद्रुपीकरण होत असल्याचे', बोलल्याबद्दल फार वाईट भाषेत टीका सहन करावी लागली', याकडे देखील तांबेंनी लक्ष वेधलं.

संगमनेरची विकासाची वाटचाल सांगताना सत्यजीत तांबेंनी, 'संगमनेरच्या सहकारी व सहकारी बँकांमधील ठेवी आज ७००० कोटींच्या घरात आहेत, संगमनेरात रोज ९ लाख लिटर दूध तयार होते, संगमनेरमधील दोनच गावात कुक्कुटपालनातून रोज ७ लाख अंडे तयार होतात, संगमनेर कारखाना राज्यातील एक उत्कृष्ट सहकारी साखर कारखाना म्हणून ओळखला जातो. संगमनेरमध्ये ५ मेडिकल कॉलेज आहेत, ज्यातील चार बाळासाहेब थोरातांच्या विरोधकांचे आहेत, म्हणजेच येथे द्वेषाचे राजकारण नाही, संगमनेरात सगळ्या शिक्षण संस्था मिळून २५००० मुले–मुली उच्च शिक्षण घेतात.

प्रवरा नदीला पाणी नसतांना संगमनेर शहराला पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत होती, आता निळवंडे धरणातून २४ तास स्वच्छ पाणी भेटते', याकडे आमदार तांबेंनी लक्ष वेधलं. हे काय उगाच झालेले नाही, पर्जन्य छायेच्या भागात असलेला व एके काळचा दुष्काळी तालुका आज सुजलाम्–सुफलाम् झाला, यात स्वातंत्र्य सेनानी (कै.) भाऊसाहेब थोरात व त्यांच्या नंतर बाळासाहेब थोरात यांचे प्रचंड योगदान आहे, जे कोणीही शहाणा माणूस नाकारू शकत नाही. कालच्या तथाकथित कीर्तनकाराची टीका ही राजकीय तर, आहेच पण संगमनेरच्या सामाजिक घडीला बदनाम करणारी आहे', अशी चिंता आमदार तांबे यांनी म्हटले. संगमनेरची स्वाभिमानी जनता हे कधीही सहन करणार नाही! असाही इशारा आमदार तांबे यांनी दिला

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई,शाखा केज च्या वतीने पत्रकार चंद्रकांत पाटील यांचा ५४ वा वाढदिवस साजरा



बीड (प्रतिनिधी)

आयुष्य हा एक सुंदर प्रवास आहे,एक नदी सारखा जो सतत वाहत असतो.प्रत्येक दिवस नवा अनुभव घेऊन येतो,पण वाढदिवस हा एक विशेष दिवस असतो.हादिवस आनंद, खुशी आणि नवीन आशा घेऊन येतो.वाढदिवस म्हणजे आपल्या प्रियजनां सोबत एकत्र येऊन त्यांचा खास दिवस साजरा करण्याचा, आनंद आणि उत्सव अनुभवण्याचा वेळ आहे.हा दिवस जीवना तील यश,स्वप्ने आणि प्रेम साजरे करण्याची एक खास संधी देतो.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई,शाखा केज च्या वतीने संघातील सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पत्रकार तथा महाराष्ट्राचे पत्रकार संघ मुंबई शाखा केजचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचा ५४ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.चंद्रकांत पाटील यांच्या वर वाढदिवसाच्या निमित्ताने विविध क्षेत्रा तून शुभेच्छांचा वर्षाव झाला. यामध्ये केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड,बाजीराव ढाकणे जिल्हा समन्वयक गो- शाळा जलदुत, पर्यावरण प्रेमी तथा जिल्हा समन्वयक महा एनजीओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य,भारतीय नमो संघाचे प्रदेश अध्यक्ष भाऊसाहेब घोडके यांनी वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन केले आहे.यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केजचे उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड, सचिव विजय बिक्कड, कार्याध्यक्ष नंदूलाल मिसाळ,प्रसिद्धीप्रमुख पांडुरंग कसबे,पत्रकार हिराचंद काळे,पत्रकार सचिन साखरे आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

# पाटोदा महावितरणचा बेजबाबदारपणा!

# राष्ट्रीय महामार्गावर विद्युत डीपीमुळे नागरिकांचा जीव धोक्यात



पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा शहरातून जाणाऱ्या पाटोदा मांजरसुंभा राष्ट्रीय महामार्गावर महावितरण विभागाने थेट रस्त्याच्या कडेला विद्युत डीपी बसवून ठेवला आहे. या निष्काळजी कारभारामुळे वाहनधारकांच्या जीवावर बेतण्याची वेळ आली असून, कधीही मोठा अपघात होऊ शकतो. डीपीजवळ मोठा खड्डा असून, तिथे कोणताही सूचना फलक, रिफ्लेक्टर किंवा सुरक्षेची चिन्हे बसवलेली नाहीत.याआधीच या ठिकाणी अपघात झाल्याचे स्थानिकांनी सांगितले असून, पुन्हा अशाच दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.नागरिकांचा संताप उफाळून आला असून त्यांनी ठाम शब्दांत इशारा दिला आहे अपघात झाल्यास महावितरण विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण जबाबदार राहील. जीव गेला, तर अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला जाईल! स्थानिक नागरिक, सामाजिक संघटना महावितरणला अल्टिमेटम दिला आहे की, मनुष्यहानी होण्याआधी ही डीपी तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवावा.अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरून पाटोदा महावितरणच्या बेजबाबदारपणा विरोधात तीव्र आंदोलन करावे लागेल.



## महागड्या कारमधून गुटखा वाहतूक
# गुन्हे शाखेने टाकला छापा

परळी / प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा काळ्या रंगाच्या होंडाई कंपनीची क्रेटा कार मधून वाहतूक होत असल्याच्या माहिती मिळाली बीड स्थानीक गुन्हे शाखेने सापळा रचून चारचाकी वाहन व प्रतिबंधीत साहित्य जप्त केला.राज्यात प्रतिबंधीत असलेला पान मसाला आणि गुटखा याची तालुक्यातील धर्मापुरी या गावातून वाहतूक होणार असल्याच्या खबरीवरून बीड स्थानिक गुन्हे शाखेचे रामचंद्र केकान, गोविंद भतानेसचिन आंधळे यांनी मंगळवार दि १९ रोजी सापळा रचून काळा रंगाची क्रेटा गाडी ज्या मध्ये वेगवेगळ्या कंपनीचा पान मसाला व गुटखा व गाडी असा ११ लाख ३० हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.न.३६७/२५.कलम १२३,२७४,२७५,२२३, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून यातील आरोपीने घटना स्थळावरून पळ काढला.

# शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य यांचा राज्यस्तरीय शब्दगंध सामाजिक कार्य गौरव पुरस्कार शिरीषभाऊ थोरवे यांना प्रदान

आष्टी (प्रतिनिधी)

शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य यांचे दुसरे राज्यस्तरीय मध्यवर्ती साहित्य संवाद व कवी संमेलन आळंदी देवाची जिल्हा पुणे येथे नुकतेच पार पडले. जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा दिव्यांग नेते श्री. शिरीषभाऊ शिवराम थोरवे यांनी समाजाप्रती केलेल्या कामाची दखल घेतली आहे, त्यांनी आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे तसेच स्वतः २७ वेळा रक्तदान केलेले आहे. कोविडच्या काळात दिव्यांगांना किराणा, दिव्यांगांची तपासणी, तीन चाकी सायकल वाटप, मुलांना ड्रेस वाटप यासारख्या अनेक त्यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय शब्दगंध सामाजिक कार्य गौरव पुरस्कार २०२५ देऊन सामाजिक कार्यकर्त्यांना नवे मापदंड रचणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्याचा शाल, श्रीफळ, ट्रॉफी, सन्मान पत्र देऊन सन्मान केला.

याप्रसंगी शब्दगंध साहित्यिक परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, संस्थापक सचिव सुनील गोसावी, उदागे महाराज संमेलनाध्यक्ष फकीरा पवार (उद्योजक पुणे), प्राचार्य खासेराव शितोळे सर, कवी सांगळे सर, घुले साहेब, संपादक डॉ. कमलकांत वडेलकर यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. या सन्मानासाठी माजी मंत्री तथा विद्यमान आ. सुरेश (आण्णा) धस, माजी आमदार साहेबरावजी दरेकर नाना, शशिकांत गाडे सर, मा.जे.आर. पवार साहेब, माऊली अप्पा जरांगे, डॉ.निंबोरे, इंजि. रमेश ढोबळे पाटील, परमेश्वर शेळके काका, मा. सभापती अंकुशराव चव्हाण, कांतीलाल चानोदीया, दै. सकाळ चे कार्य. संपादक अनील लगड, जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल भाऊ सहस्त्रबुद्धे, झुंजार नेता चे उपसंपादक उत्तम बोडखे, दैनिक पुढारी चे सूर्यकांत वरकड, दिव्यांग कर्मचारी



संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र लाड सर, राजाभाऊ शेळके, सचिन पाटील थोरवे, कृषी भूषण हनुमंतराव गावडे, डॉ. अनील गर्जे सर, गोंदकर सर, डॉ. हनुमंत काकडे, बाळासाहेब शेंदूरकर सर तसेच धानोरा, खुंटेफळ, सोलापूर वाडी ग्रामस्थ व परिसरातील नातेवाईक व मित्रमंडळी या सर्वांनी शिरीषभाऊ थोरवे यांचे अभिनंदन केले आहे. शब्दगंध परिषदेने एका प्रामाणिक सामाजिक कार्यकर्त्याला न्याय दिल्यामुळे सर्व स्तरातून

# बीडमध्ये वाहनांचे नियम तोडल्यास आता सीसीटीव्ही कैद होणार

## ऑनलाइन दंडात्मक कारवाईचा दणका नियम तोडणाऱ्यांना बसणार !

बीड /प्रतिनिधी

बेशिस्त वाहनचालकांसाठी बीड पोलिसांनी आता बीड शहरातील एकूण ४७ ठिकाणी कॅमेरे लावले आहेत. जो वाहनांचे नियम तोडेल त्याच्या विरुद्ध ऑनलाईन दंडात्मक कारवाई येणाऱ्या आठ दिवसांमध्ये केली जाणार आहे.तरी सर्व जनतेला आवाहन करण्यात येत आहे की वाहतुकीचे नियम पाळा आणि आपली सुरक्षितता बाळगा व आपल्यावर दंड पडणार नाही या अनुषंगाने सर्वांनी दक्षता घ्यावी.

बीड शहरामध्ये जनतेने वाहतुकीचे नियम पाळावेत याकरिता पोलीस प्रशासन कायम प्रयत्नशील असते. वाहतुकीचे नियम न पाळल्यामुळे होणाऱ्या अपघातांची संख्या वाढत चाललेली आहे. वाढती वाहनांची संख्या यामुळे वाहतुकीचे नियम पाळणे खूप गरजेचे आहे जेणेकरून प्रत्येकालाच रस्त्यावर चालणे किंवा शहरात वावरणे सोयीस्कर होईल. त्याकरिता बीड शहरात प्रवेश करताना व बीड शहरात फिरताना वाहनधारकांनी वाहतुकीचे नियम तोडल्यास सीसीटीव्हीच्या माध्यमातून त्यांच्यावर नजर ठेवून कारवाई करण्याचे विचाराधीन होते. त्याबाबतची प्रक्रिया पूर्ण झालेली असून येत्या आठ दिवसात वाहतुकीचे नियम तोडणाऱ्या वाहनधारकावर सीसीटीव्हीच्या माध्यमातून चलन करून दंड करण्यात येणार आहे .

बेशिस्त वाहनचालकांसाठी बीड पोलिसांनी आता बीड शहरातील एकूण ४७ ठिकाणी कॅमेरे लावले आहेत. जो वाहनांचे नियम तोडेल त्याच्या विरुद्ध ऑनलाईन दंडात्मक कारवाई येणाऱ्या आठ दिवसांमध्ये केली जाणार आहे.

# माजलगाव शहरात भव्य अमृत मेळाव्याचे आयोजन

दिनांक २३ ऑगस्ट २०२५ शनिवार रोजी वैष्णवी कार्यालय येथे सकाळी दहा ते एक वाजता अमृत संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक व्यावसायिक अर्थसहाय्य कसे प्राप्त होते या सह विविध क्षेत्रातील विविध विषयाचे सखोल मार्गदर्शन होणार आहे. हे मार्गदर्शन करण्यासाठी बीड येथील जिल्हा उद्योग केंद्रातील , शासकीय अधिकारी व माजलगाव येथील तहसीलदारसह विविध अधिकारी उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्रातील शासनाने ज्या खुल्या प्रवर्गातील जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग संस्था महामंडळामार्फत योजनांचा लाभ मिळत नाही अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील युवक युवती व इतर उमेदवारांसाठी विविध उपक्रम कार्यक्रम इत्यादी राबवण्यात येणार असून इतर माध्यमातूनही विद्यार्थी व युवक युवती व इतरांचा आर्थिक व सर्वांगीण विकास घडवण्यासाठी महाराष्ट्र संशोधन उन्नती ही संस्था स्थापन केली आहे. अमृत संस्थेच्या विविध योजना सर्व



स्तरातील अमृतलक्षित गटापर्यंत पोहोचण्यासाठी माजलगाव शहरात वैष्णवी कार्यालय येथे दिनांक २३ ऑगस्ट शनिवार रोजी सकाळी दहा ते एक या वेळेत अमृत मेळाव्याचे आयोजन केले आहे. या अमृत मेळावा च्या माध्यमातून अमृतलक्षित गटातील म्हणजेच ब्राह्मण मारवाडी गुजराती आर्य वैश्य अशा लाभार्थ्या करिता विविध योजना जसे शिक्षण व्यवसाय अर्थसहाय्य कौशल्य विकास इत्यादी विषयांची माहिती सविस्तर देण्यात येणार आहे. तरी या अमृत संस्थेच्या होणाऱ्या मेळाव्यास सर्वांनी उपस्थित राहावे ही विनंती.

# सततच्या पावसाने खरिपाची पिके पिवळी पडू लागली

## पाली मंडळात तात्काळ पिकाची पंचनामे करा शेतकऱ्यांची मागणी

पाली (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील मौजे पाली परिसरात सततच्या पावसाने सोयाबीन, कापूस तुर आधी खरिपाची पिकांना पाणी लागल्यामुळे पिके पिवळी पडू लागली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अतोनात नुकसान झाले आहे. तात्काळ तहसीलदार यांनी मंडळ अधिकारी व तलाठी अधिकारी यांना पंचनामे चे आदेश द्यावे अशी मागणी पाली येथील शेतकऱ्यांनी केली आहे.

खरीप हंगामातील सध्या पिके जोमात आली होती मात्र सततच्या पावसाने हे पिके पिवळी पडली आहे व काही पिके पाण्याखाली गेल्यामुळे जागीच कुजली आहेत. तर काही पिके त्याच प्रामुख्याने मूग ह्या पिकांना रानडुकरा मुळे हे पिके शेंगा खाण्यासाठी रानडुक्कर जागी च पिके उध्वस्त करीत आहेत, तोंड घाशी आलेले मुगाचे पीक मात्र रानडुकरामुळे तोंड घास आलेले पीक डोळ्यासमोर उध्वस होत असल्याने शेतकरी परिशान झाले आहेत.

सध्या आठ दहा दिवसापासून सतत पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांचे उभे पिके पिवळी पडू लागल्यामुळे , शेतकरी हवालदिल झाला आहे.

खरीप हंगामासाठी बँकेकडून घेतले कर्ज, खाजगी सावकाराकडून घेतलेले कर्ज काढून बियाणे, औषध कीटकनाशके ,रासायनिक खते नांगरणी पाळी, खुरपण यांना खर्च केला मात्र पदरी निराशाच आली.

तात्काळ तहसीलदार साहेबांनी मंडळ अधिकारी व तलाठी अधिकारी यांना पंचनामाचे आदेश देऊन तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी पाली येथील शेतकऱ्यांनी केली आहे.

# बालरंगभूमी च्या माध्यमातून चिमुकल्यांनी साकारला इतिहास महाराष्ट्राचा

## समूह गटात जिजाऊ ज्ञानतीर्थ ; तर एकल स्पर्धेत समर्थ मुंढे प्रथम

परभणी : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनपटावर आधारित कलाविष्काराने चिमुकल्यां कलावंतांनी इतिहास महाराष्ट्राचा साकारला. अंतिम फेरी मुंबई येथे होणार आहे.

बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सौ. निलम शिर्के सामंत यांच्या संकल्पनेतून इतिहास महाराष्ट्राचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवा पासून ते शिवराज्याभिषेक सोहळ्यापर्यंतच्या आयुष्यावर आधारित नाटिका, समूह नृत्य,एकपात्री अभिनय या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे आयोजन बालरंगभूमी परिषद शाखा परभणी च्या वतीने गंगा मंगल कार्यालयामध्ये केले होते.

अध्यक्षस्थानी बालरंगभूमी चे अध्यक्ष आबा ढोले तर प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्ष प्रा. नितीन लोहट, कोषाध्यक्ष संजय पांडे, समन्वयक प्रमोद बल्लाळ, अभिजित सराफ, राज्य कार्यकारिणीचे सदस्य त्र्यंबक वडसकर सुनील जाधव, प्रा. हनुमान व्हरगुळे, राजाभाऊ चव्हाण यांची उपस्थिती होती.

चिमुकल्या बालकलाकारांनी उत्कृष्ट असे सादरीकरण करत उपस्थितांची दाद मिळवली. नाटिका, नृत्य, एकपात्री, पोवाडे सादर केले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून ॲड. रवी कातनेश्वरकर, प्रकाश बारबिंड, संदीप राठोड यांनी काम पाहिले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी बालरंगभूमी परिषद शाखा परभणीचे सदस्य बालाजी दामूके,रवी पुराणिक,अनिकेत शेंडे, सचिन आढे, लक्ष्मीकांत जोगेवार, कुलदीप उंडाळकर, सिद्धेश्वर जाधव, प्रकाश पंडित, अनिल वाघ, गणपती गिराम, गोपी मुंडे, अर्जुन भिसे, शिवाजी सूक्ते, शिवाजी सुगंधे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन त्र्यंबक वडसकर, प्रास्ताविक दिनकर देशपांडे यांनी



केले तर आभार राजू वाघ यांनी मांनले.

विजेते बालकलावंत...

एकपात्री प्रयोगामध्ये लक्षवेधी बालकलाकार म्हणून गीता लाड, मालाश्री लाड, सोनाक्षी वाघ, उत्तम स्वरा कुलकर्णी , उत्कृष्ट समृद्धी काळे तर सर्वोत्कृष्ट समर्थ गोपी मुंडे यांनी पारितोषिक पटकावले.

तर समूह गटामध्ये लक्षवेधी अभिनयासाठी नृसिंह विद्यामंदिर पोखर्णी (नृ.), मराठवाडा हायस्कूल परभणी, उत्तम अभिनयासाठी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पोखर्णी, उत्कृष्ट तेजोमय प्रतिष्ठान परभणी, सर्वोत्कृष्ट जिजाऊ ज्ञानतीर्थ मानवत रोड च्या संघाने पटकावले.

या स्पर्धेमध्ये सर्वोत्कृष्ट व उत्कृष्ट विजेत्यांना मुंबई येथे होणाऱ्या अंतिम फेरीत प्रवेश मिळणार आहे. ही स्पर्धा २३ व २४ ऑगस्ट रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह माटुंगा येथे होणार आहे.



परभणी /प्रतिनिधी

परभणी जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना आर्थिक मदत करा अशी मागणी आ.डॉ.राहुल पाटील यांच्या आदेशानुसार शिवसेना ठाकरे गटाच्या किसान सभेच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे आज सोमवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी करण्यात आली.

परभणी जिल्ह्यामध्ये दिनांक १४ आणि १५ ऑगस्ट अशा दोन दिवसात अतिवृष्टी झाली आहे. लिमला परभणी ग्रामीण मधील बहुतांश गावे तसेच कातनेश्वर, रावराजुर यासह अनेक भागांमध्ये अतिवृष्टी झाली आहे.त्याच्या नोंदी देखील प्रशासनाकडे आहेत यामुळे खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, मूग, उडीद,तूर या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यासोबत शेत आखाडे, शेत जमिनी देखील बाधित झाल्या आहेत.या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या कार्यपद्धतीनुसार महसूल यंत्रणेमार्फत तात्काळ पंचनामे करून नुकसानीचा तपशीलवार प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक आहे, अशा नैसर्गिक आपत्तीत एस डी आर एफ आणि एनडीआरएफ निधी अंतर्गत निधी वितरणाकरिता जिल्हा प्रशासनाची भूमिका निर्णायक असते त्यानुसार आवश्यक प्रस्ताव तयार करून शासनास सादर करावा जेणेकरून निधी वितरण प्रक्रियेची पूर्तता नियमानुसार होईल अशी मागणी किसान सभेने केली आहे